cmyk

## संपादकीय

### घाई घाईचे काम अन् चुकीचा संदेश

एका मराठी चित्रपटात नायिका आपल्या आईला सवाल करताना म्हणते, 'आई माझ्या लग्नाची गं, का तुलाच पडली घाई..' आज राजकीय क्षेत्रात याच चालीवर काँग्रेसने सत्ताधा-यांना सवाल केला आहे. नव्या केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीची घाई का, असा काँग्रेसचा सवाल आहे. निवडणूक आयुक्त निवडीसाठी करण्यात आलेला कायदा पक्षपाती आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com







बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२९८ | गुरूवार, दि.२० फेब्रुवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# पीएम किसान, नमोचा हप्ता आठवड्याच्या फरकाने मिळणार?



## पंतप्रधान नरेंद्र मोदी २४ फेब्रुवारीला हप्ता करणार वितरित



**मुंबई | प्रतिनिधी**

**पीएम किसान आणि नमो किसानचे हप्ते कधी वितरित होणार याबाबत शेतकऱ्यांना उत्सुकता लागली आहे. दोन्ही हप्त्याबाबत मोठी अपडेट समोर आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या हस्ते २४ फेबुवारी रोजी बिहारमधील एका कार्यक्रमात पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेचा निधीचा हप्ता वितरित करण्यात येणार आहे. तर राज्य सरकारच्या नमो सन्मान निधी योजनेचा ६ वा हप्ता १ मार्चपर्यंत शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर वितरित करण्यात येईल, अशी माहिती खात्रीलायक सुत्रांनी दिली आहे.**

लाडकी बहिण योजनेच्या पैशांमुळे राज्य सरकारच्या तिजोरीवर बोजा पडला असल्याने बऱ्याच योजनेचे अनुदान, हप्ता मिळण्यास विलंब होत असल्याने पीएम किसानसह नमो किसानचा हप्ता मिळणार का? याबाबत शेतकऱ्यांमध्ये उत्सुकता आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदींनी वाशिम जिल्ह्यात पीएम किसानच्या १८ व्या आणि नमो किसानच्या ५ व्या हप्त्याचे वितरण केले होते. पीएम किसानच्या १८ व्या हप्त्याचे वितरण ९.४ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात करण्यात आले होते. तर राज्यातील ९१ लाख शेतकऱ्यांना पीएम किसानसह नमोचा हप्ता जमा करण्यात आला होता. केंद्र सरकारच्या धर्तीवर शेतकऱ्यांना वार्षिक सहा हजार रुपये देण्यासाठी राज्य सरकारने २०२३ पासून नमो शेतकरी महासन्मान योजनांचा राबवण्याचा निर्णय घेतला. या योजनेतुन आत्तापर्यंत ५ हप्त्याचे वितरण करण्यात आले आहे. पीएम किसानच्या १८ हप्त्यासाठी पात्र ठरलेली शेतकरी नमो शेतकरी महासन्मान ◀◀ पान २ वर

### १९ व्या हप्त्यासाठी ई–केवायसी आवश्यक

दरम्यान, पीएम किसानच्या १९ व्या हप्त्याचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी ई–केवायसी करून घ्यावी, अन्यथा शेतकरी पीएम किसानच्या लाभापासून वंचित राहू शकतात.

## कॅबिनेटचा अजेंडा लिक केल्यास कारवाई–फडणवीस

**मुंबई | प्रतिनिधी**

**कॅबिनेटचा अजेंडा बैठक होण्याअगोदरच लिक होतो, तो छापून येतो, हे बरोबर नाही. मंत्री म्हणून आपण याच गोपनियतेची शपथ घेतो, असे सांगून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कॅबिनेटचा अजेंडा लिक केल्यास थेट कारवाई केली जाईल, अशी तंबी त्यांनी दिली.**



कॅबिनेट बैठकीचा अजेंडा बैठक होण्यापुर्वीच छापला गेला होता. त्यावर अजेंडा बैठक होण्यापुर्वीच लिक होत असल्याचे दिसून आले होते. त्यामुळे यावरुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस चांगलेच आक्रमक झाले आहेत. मंत्री म्हणून आपण गुप्ततेची शपथ घेतली आहे. त्यामुळे सर्व मंत्र्यांनी आपल्या कार्यालयांना याबाबत सांगावे अन्यथा कारवाई करण्याची तंबी मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. यावर ठाकरे गटाचे खा. संजय राऊत यांनी पलटवार केला आहे. ठाकरे सरकारमध्ये जे मंत्री होते, ◀◀ पान २ वर

# सुरेश धस–धनंजय मुंडेंच्या भेटीनंतर चक्रं फिरली

## संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या चार्जशीटमध्ये फेरफार, मनोज जरांगेंचा गंभीर आरोप

**बीड | प्रतिनिधी**

**भाजप आमदार सुरेश धस आणि मंत्री धनंजय मुंडे यांच्यात झालेल्या गुप्त भेटीनंतर संतोष देशमुख हत्याप्रकरणाच्या चार्जशीटमध्ये फेरफार होण्याची शक्यता आहे, असा संशय मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी व्यक्त केला. भाजपकडून सुरेश धस यांच्यावर धनंजय मुंडे यांना भेटण्यासाठी दबाव आणण्यात आला. धनंजय मुंडे यांची भेट घेण्यापूर्वी सुरेश धस यांनी भाजपकडून येणाऱ्या दबावाबाबत सांगायला हवे होते. तसे केले असते तर मराठा समाजाने सुरेश धस यांना डोक्यावर घेतले असते. पुढच्या निवडणुकीत एक लाख ६७ हजार मतांनी सुरेश धस यांना मराठ्यांनी निवडून आणले असते. परंतु, सुरेश धस यांनी परस्पर धनंजय मुंडे यांची भेट घेतल्याने मराठा समाजाचा सुरेश धस यांच्यावरील विश्वास उडाला आहे, असे मनोज जरांगे पाटील यांनी म्हटले.**





### “ मुंडे–धस भेटीत मोठी डील झाली–राऊत

ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनीही धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्या भेटीत काहीतरी मोठी डील झाल्याचा दावा केला. डील झाल्याशिवाय सुरेश धस ज्या वेगाने पुढे गेले किंवा ज्या वेगाने त्यांनी आका आणि आकाच्या आकावर हल्ले केले, ज्या पद्धतीने त्यांनी काही कागद आणि पुरावे पुढे आणले, त्या सगळ्याला अचानक ब्रेक लागला आहे. चंद्रशेखर बावनकुळे त्यांचे बॉस आहेत, असे ते म्हणतात. देवेंद्र फडणवीस देखील त्यांच्या बॉसचे बॉस आहेत, मग सुरेश धस यांच्या बॉसनेच त्यांना ट्रॅपमध्ये पकडले का?, असा संशय संजय राऊत यांनी व्यक्त केला होता. धस माघार घेतली हे मला एका चांगल्या माणसाने अगोदरच सांगितल्याचे राऊत म्हणाले.

### “ आंदोलन दडपण्यासाठी सरकारचा नवा प्लॅन?

सरकार आणखी एक मराठा आंदोलन उभे करणार आहे. त्या आंदोलनात दोन मंत्री असणार आहे. १२ ते १३ दिवस आमरण उपोषण करणार आहेत. त्यातील एका मंत्र्यांनी मला ही माहिती दिली, असा दावा मनोज जरांगे यांनी केला आहे. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत दोन मंत्र्यांची चर्चा झाल्याचेही ते म्हणाले.

### “ 'त्या' नासक्या मंत्र्यांचे नाव घेऊ नका–जरांगे

सुरेश धस यांना आम्ही खूप जीव लावला होता, असे वक्तव्य मनोज जरांगे पाटील यांनी कळंब येथे बोलताना केले आहे. मंत्री धनंजय मुंडे आणि सुरेश धस यांच्या भेटीवर सवाल केला असता मनोज जरांगे पाटील यांनी खंत व्यक्त केली आहे. आज शिवजंयती सारखा चांगला दिवस असून त्यामुळे क्रूर आणि नासक्या मंत्र्यांचे नाव घेऊ नका, असे म्हणत मनोज जरांगे पाटील यांनी मंत्री धनंजय मुंडे यांच्यावर सडकून टीकास्त्र सोडले.

### “ सुरेश धस यांच्यावर पक्षाचा दबाब–जरांगे

मनोज जरांगे म्हणाले, धनंजय मुंडे यांना भेटण्यासाठी सुरेश दासावर भाजपाने दबाव आणला. परंतु सुरेश धस यांनी मराठ्याला हे सांगणे गरजेचे होते की, माझ्यावर पक्षाने दबाव आणला आहे. मात्र सुरेश धस यांनी धनंजय मुंडे यांची भेट घेतली. आमचा सुरेश धस यांच्यावर भरपूर जीव होता. परंतु सुरेश धस धनंजय मुंडेला भेटले. यामुळे मराठ्यांचा विश्वास उडाला, असे ते म्हणाले.

### ठाकरे सेना देशमुख खून प्रकरणात लक्ष घालणार

उध्दव ठाकरे हे लवकरच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची मस्साजोग येथे जावून भेट घेणार आहेत. तसेच देशमुख खून प्रकरणात ठाकरे सेना यापुढे लक्ष घालणार असल्याचे संजय राऊत यांनी म्हटले आहे.

### धनंजय देशमुखांना मी अगोदरच हे सांगितले होते–दमानिया

आष्टी मतदार संघात वाल्मिक कराड यांनी लक्ष घातले होते, ते त्या ठिकाणी कामे करीत होते. त्यामुळे सुरेश धस यांनी त्यांना रोखण्यासाठी संतोष देशमुख खून प्रकरणात लक्ष घालून मुद्दा उचलून धरला. मी धनंजय देशमुख यांना अगोदरच सांगितले होते की, धस कधीही माघार घेतील. सध्या तसेच झाल्याचे अंजली दमानिया यांनी म्हटले आहे.

### “ कुठल्याही गोष्टीला लिमीट असते –गोगावले

सोलापूर : मंत्री भरत गोगावले बुधवारी पंढरपूरमध्ये विठ्ठल–रुक्मिणीच्या दर्शनासाठी गेले असता धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याच्या मागणीसंदर्भात देखील त्यांना प्रश्न विचारण्यात आला होता. कुठल्याही गोष्टीला लिमीट आहे, लिमीट पार झाले की ते आपोआप होते. त्यांचे नेतेमंडळीही काल–परवापासून बोलायला लागले आहेत. मला असे वाटते की, अजित दादा, शिंदे साहेब आणि मुख्यमंत्री देवेंद्रजी एकत्र बसून यासंदर्भात निर्णय होईल, असे गोगावले यांनी म्हटले आहे.

## रेखा गुप्ता दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री

**नवी दिल्ली | वृतसंस्था**

दिल्लीमध्ये भाजपने २७ वर्षानंतर आपच्या गडाला सुरुंग लावत सत्ता मिळवली. रेखा गुप्ता या दिल्लीच्या नव्या मुख्यमंत्री असणार आहेत. तर उपमुख्यमंत्रिपदाच्या शर्यतीमध्ये प्रवेश वर्मा यांचे नाव सर्वात आघाडीवर आहे, त्यामुळे आता त्यांच्यावर नावावर उपमुख्यमंत्री पदासाठी शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे. तर रेखा गुप्ता या मुख्यमंत्री म्हणून गुरुवार, दि. २० फेब्रुवारी रोजी शपथ घेणार आहेत. पक्षाचे दोन निरीक्षक रविशंकर प्रसाद आणि ओम प्रकाश धनखड यांनी दिल्लीच्या मुख्यमंत्रिपदावर कोण असावे? यावर दिल्लीच्या आमदारांसोबत वन टू वन चर्चा केली, त्यानंतर रेखा गुप्ता यांचे नाव जाहीर करण्यात आले आहे.

### बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१८ फेब्रुवारी २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४७.०० क्विंटल | २,४६० | ३,३८२ | ३,००० |
| ज्वारी/हायब्रिड :११३.०० क्विंटल | ३,४५० | १,९०० | २,३८१ |
| मका/लोकल:५.०० क्विंटल | २,२०१ | २,२०१ | २,२०१ |
| तूर : ४३.५० क्विंटल | ६,५०० | ७,५०० | ७,१७६ |
| उडीद : ०.५० क्विंटल | ६,००१ | ६,००१ | ६,००१ |
| बाजरी: २,१५० क्विंटल | २,८०१ | २,५९८ | २,५५८ |
| मुग : ०.५० क्विंटल | ७,१०० | ७,१०० | ७,१०० |
| सोयाबीन: ९८.०० क्विंटल | ३,९५० | ४,०५१ | ४,००६ |
| हरभरा: २९.५० क्विंटल | ५,५०० | ९,००१ | ७,०३३ |

### गेवराईत शिवशाही महानाट्य पाहण्यास गर्दी उसळली

## आ.विजयसिंह पंडित यांच्या तगड्या नियोजनात शिवजन्मोत्सव सोहळा साजरा



**गेवराई | प्रतिनिधी**

गेवराई शहरात आ. विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली शारदा प्रतिष्ठान आणि राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीच्या वतीने आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्यात सायंकाळी ऐतिहासिक शिवशाही महानाट्याचा पहिला शो दिमाखात सुरु झाला. यावेळी शहाजीराजे आणि शिवरायांचा इतिहास डोळ्यात साठविण्यासाठी गेवराई शहरासह विधानसभा मतदारसंघाती नागरिकांनी उत्स्फूर्त गर्दी केली होती. आ.विजयसिंह पंडित यांच्या तगड्या नियोजनात महानाट्याच्या शुभारंभासह शिवजन्मोत्सव सोहळा मोठ्या थाटात साजरा करण्यात आला. यावेळी जिल्हाधिकारी अविनाश पाठक, माजी मंत्री शिवाजीराव (दादा ) पंडित, माजी आमदार विलासराव खरात, धाराशिव येथील एनईपी शुगरचे नानासाहेब पाटील, ◀◀ पान २ वर

## अंजली दमानिया यांचे पुन्हा अर्धवट ज्ञान आणि खोट्या आरोपांचे प्रदर्शन

### धनंजय मुंडे यांच्याकडून अंजली दमानिया यांच्या आरोपांचे खंडन

**मुंबई | प्रतिनिधी**

**अंजली दमानिया यांनी आज पुन्हा एकदा अर्धवट ज्ञानाच्या आधारे खोटे बोलून जीआर काढला वगैरे म्हणून जे आरोप केले आहेत ते संपूर्णपणे चुकीचे असून त्या आपल्या अर्धवट ज्ञानाच्या आधारे खोटे आरोप करत असल्याचा खुलासा धनंजय मुंडे यांनी केला आहे.**



शासनाच्या कार्य नियमावलीनुसार ( रुल्स ऑफ बिजनेस ) जीआर अर्थात शासन निर्णय निर्गमित करण्यासाठीची एक पद्धत आहे, त्यासाठी प्रक्रिया आखून देण्यात आलेली आहे . विभागातील कक्ष अधिकाऱ्याने त्या प्रकरणाची फाईल सादर केल्यानंतर ती उपसचिव, विभागाचे सचिव, अतिरिक्त मुख्य सचिव यांचे मार्फत मंत्र्यांच्या समोर मान्यतेस्तव येत असते, मंत्र्यांची मान्यता होण्यापूर्वी व झाल्या नंतर सुद्धा अतिरिक्त मुख्य सचिव दर्जाचे आय ए एस अधिकारी स्वतः ती फाईल तपासतात आणि त्या नंतरच तो ◀◀ पान २ वर

# जल्लोष शिवजयंतीचा! बीडमध्ये ऐतिहासिक शिवजयंती साजरी

## सांस्कृतिक कार्यक्रम, साहसी खेळांची बीडकरांना मेजवानी



**बीड| प्रतिनिधी**

**दरवर्षीप्रमाणे याहीवर्षी सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहर यांच्या माध्यमातून, आ.संदीप क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली डीजेमुक्त आणि वर्गणीमुक्त सांस्कृतिक शिवजयंती सोहळा पार पडला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून बीडकरांना विविध कला–क्रीडा सादरीकरणाच्या माध्यमातून अनोखी मेजवानी मिळाली.**

सार्वजनिक शिवजयंती उत्सव समिती, बीड शहक्ष यांच्या आयोजनातून बीड शहरातील छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगणावर बुधवारी (दि.१९) रोजी शिवजन्मोत्सव सोहळ्याचा कार्यक्रम पार पडला. यावेळी लाखो ◀◀ पान २ वर

### “ संदीपभैय्यांना मानावेच लागेल– मनोज जरांगे पाटील

अशा प्रकारची शिवजयंती मी पहिल्यांदाच पाहतोय. अशा प्रकारचे कौतुकास्पद नियोजन आणि आयोजन आ.संदीप भैय्या क्षीरसागर यांच्या मार्गदर्शनाखाली झालेले आहे. महिला भगिनींनाही शिवजयंती उत्सवात सहभागी होता येईल याची काळजी शिवजयंती उत्सव समितीकडून घेतली जाते. ही विशेष बाब आहे. यासाठी तर संदीपभैय्यांना मानावेच लागते. अशा शब्दांत संघर्षयोध्दा मनोज जरांगे पाटील यांनी आ.संदीप क्षीरसागर व शिवजयंती उत्सव समितीचे कौतुक केले.

cmyk

## अग्रलेख

# घाई घाईचे काम अन् चुकीचा संदेश

एका मराठी चित्रपटात नायिका आपल्या आईला सवाल करताना म्हणते, 'आई माझ्या लग्नाची गं, का तुलाच पडली घाई..' आज राजकीय क्षेत्रात याच चालीवर काँग्रेसने सत्ताधा–यांना सवाल केला आहे. नव्या केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीची घाई का, असा काँग्रेसचा सवाल आहे. निवडणूक आयुक्त निवडीसाठी करण्यात आलेला कायदा पक्षपाती आहे. निवड समितीतून सरन्यायाधीशांना वगळून केंद्र सरकारला निवडणूक आयोगाच्या विश्वासार्हतेपेक्षा त्यावर नियंत्रण ठेवणे अधिक महत्त्वाचे वाटत असल्याचे स्पष्ट होते असे काँग्रेस नेते अभिषेक मनू सिंघवी यांनी म्हटले आहे. केंद्र सरकारने २०२३ मध्ये केलेल्या कायद्यात निवड समितीमधून सरन्यायाधीशांना वगळण्यात आले.

सरन्यायाधीशांऐवजी सदस्य म्हणून केंद्रीय मंत्र्यांचा समावेश करण्यात आला. समितीतून सरन्यायाधीशांना वगळल्यामुळे निष्पक्ष निवड होऊ शकत नाही, असा आरोप करत काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल केली आहे. याचिकेवर १९ फेब्रुवारीला सुनावणी होण्याची शक्यता असून निकाल दिला जाऊ शकतो. मग मुख्य निडणूक आयुक्त नियुक्तीची घाई का? विद्यमान केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार १८ फेब्रुवारी (मंगळवार) रोजी निवृत्त होत असल्याने नव्या मुख्य निवडणूक आयुक्तांच्या नियुक्तीसाठी सोमवारी (१७ फेब्रुवारी) पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या उपस्थितीत निवड समितीची बैठक झाली. मात्र बुधवारी सर्वोच्च न्यायालयात याबाबत सुनावणी होणार असल्याने निवडीची घाई का असा आरोप निवड समितीचे सदस्य आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी नोंदविला. केंद्राने अहंकार बाजूला ठेवून निवड प्रक्रिया पुढे ढकलावी अशी मागणी काँग्रेसने केली होती. केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांच्या निवडीसंदर्भात नवा कायदा करण्यात आला असून त्यानुसार सोमवारी पहिल्यांदाच निवड समितीची बैठक झाली. बैठकीला पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी उपस्थित होते. केंद्रीय विधिमंत्री अर्जुनराम मेघवाल यांच्या शोध समितीने पाच संभाव्य नावांची यादी तयार केली होती. राजीव कुमार यांच्यानंतर ज्येष्ठतेनुसार विद्यमान केंद्रीय निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांचा केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तपदासाठी विचार केला जाणार हे जवळपास निश्चित होते तरीही सत्ताधा–यांना निवडीची घाई झालीच! राहुल गांधी यांचा आक्षेप आणि काँग्रेसची मागणी बाजूला सारत ज्ञानेश कुमार यांची देशाचे नवे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली. पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली निवड समितीने देशाचे २६ वे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून त्यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले.

मावळते मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांच्या जागी आता ज्ञानेश कुमार हे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून कार्यभार स्वीकारतील. मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून त्यांच्याकडे पुढील काही महिन्यांत पश्चिम बंगाल, केरळ, तामिळनाडू, बिहार आणि आसाम या राज्यांतील विधानसभा निवडणुकीची जबाबदारी असणार आहे. ज्ञानेश कुमार हे २६ जानेवारी २०२९ रोजी सेवानिवृत्त होतील. त्यांच्या कार्यकाळात एकूण २० विधानसभा निवडणुका, २०२७ मधील राष्ट्रपती आणि उपराष्ट्रपती निवडणूक तसेच २०२९ ची लोकसभा निवडणूक होणार आहे. ज्ञानेश कुमार हे १९८८ च्या बॅचचे केरळ कॅडरमधील आयएएस अधिकारी आहेत. ते केंद्रीय गृहमंत्रालयात अतिरिक्त सचिव राहिले आहेत. त्यांनी आयआयटी कानपूर येथून सिव्हिल इंजिनीअरिंगमध्ये बी.टेकची पदवी घेतली आहे. तसेच त्यांनी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड फायनान्शियल ॲनालिस्टस ऑफ इंडिया येथून बिझनेस फायनान्सचे शिक्षण घेतले आहे. याशिवाय हार्वर्ड विद्यापीठातून पर्यावरण अर्थशास्त्राचाही अभ्यास केला आहे. २०१९ मध्ये जम्मू–काश्मीरमधील कलम ३७० रद्द करण्यासाठी विधेयकाचा मसुदा तयार करण्यात त्यांची मोठी भूमिका होती. तीन तलाक प्रथा रद्द करण्यासंबंधीच्या मसुदा समितीतही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली होती. ज्ञानेश कुमार हे केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या जवळचे मानले जातात. ६१ वर्षीय कुमार यांची लोकसभा निवडणुकीपूर्वी भारतीय निवडणूक आयोगात निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्यांच्या नियुक्तीनंतर दुस–याच दिवशी लोकसभा निवडणुकीची घोषणा करण्यात आली होती.

जम्मू आणि काश्मीरमधील कलम ३७० हटविल्यानंतर तेथील परिस्थिती हाताळण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. राम मंदिर निर्माण समितीचेही ते सदस्य होते. भारतीय संविधानाच्या कलम ३२४ अंतर्गत निवडणूक आयोगाविषयी माहिती देण्यात आली आहे. निवडणूक आयोग हा लोकसभा, विधानसभा, राज्यसभा, राष्ट्रपती–उपराष्ट्रपती यांच्या निवडणुकीसाठी जबाबदार असतो. भारतीय निवडणूक आयोगाची स्थापना १९५० ला झाली. निवडणूक आयोगातील सदस्यांमध्ये वेळोवेळी बदल झाला आहे. सध्या निवडणूक आयोगात एक मुख्य निवडणूक आयुक्तांसह दोन निवडणूक आयुक्तांचा समावेश आहे. या आधी परंपरेनुसार आयोगातील वरिष्ठ निवडणूक आयुक्तांची मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून नियुक्ती केली जात असे. सरकारच्या शिफारशीनुसार राष्ट्रपतीद्वारा ही नियुक्ती केली जात असे मात्र, २०२३ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने ही नियुक्ती केवळ शिफारशींच्या आधारावर न करता स्वतंत्र समितीमार्फत करावी असे म्हटले होते. या समितीमध्ये सरन्यायाधीशांचाही समावेश करण्यात आला होता. मात्र, नंतर सरकारने नवा कायदा आणत या प्रक्रियेत बदल केला. त्यानुसार सरन्यायाधीशांना निवड समितीतून वगळण्यात आले. नव्या निवड समितीत पंतप्रधान, पंतप्रधान नियुक्त कॅबिनेट मंत्री आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेता यांचा समावेश आहे. ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्तीबाबत काँग्रेसने आक्षेप घेतला आहे. म्हणजे नव्या मुख्य निवडणूक आयुक्तांची निवड २–१ अशा बहुमताने झाली आहे. या समितीमध्ये सरन्यायाधीशांचा समावेश नाही हा वादाचा मुद्दा ठरला आहे. सरन्यायाधीशांचा समावेश नसल्याने समिती कमकुवत झाली आहे असे काँग्रेसचे म्हणणे आहे. या प्रकरणाची सुनावणी सर्वोच्च न्यायालयात पार पडणार आहे. मात्र, सुनावणीआधीच नियुक्तीच्या घाईमागे दडलंय काय?

### आंबेगाव येथील शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण

# शिवसृष्टीला प्रेरणा आणि अभ्यासाचे केंद्र म्हणून भेट द्यावी–मुख्यमंत्री

## शिवसृष्टीच्या पुढील टप्प्यासाठी ५० कोटी रुपये निधी देण्याची मुख्यमंत्र्यांची घोषणा

**पुणे । प्रतिनिधी**

**छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्वराज्य, स्वधर्म व स्वभाषा या त्रिसुत्रीवर आधारित शिवसृष्टी येथे मांडण्यात आलेले दालन अत्यंत प्रेरणादायी असून महाराष्ट्रातील व देशातील प्रत्येक विद्यार्थ्यांनी या शिवसृष्टीला प्रेरणा आणि अभ्यासाचे केंद्र म्हणून भेट द्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवसृष्टीच्या दुसऱ्या टप्प्याचे लोकार्पण प्रसंगी केले. तसेच शिवसृष्टीच्या पुढील टप्प्याचं काम अधिक वेगाने व्हावे यासाठीही राज्य शासनाकडून आणखी ५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्याची घोषणा मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी केली.**

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, खासदार मेधा कुलकर्णी, उदयनराजे भोसले, आमदार उमा खापरे, अमित गोरखे, विजय शिवतारे, भीमराव तापकीर, सुनील कांबळे, नानासाहेब जाधव, रविंद्र वंजारवाडकर, शिवसृष्टीचे जगदीश कदम, विनय सहस्त्रबुद्धे, अमृत पुरंदरे आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे उत्तम लढवय्ये, उत्तम योद्धे तर होतेच त्याबरोबरच ते उत्तम प्रशासक होते. महिलांचा सन्मान आणि शेवटच्या घटकापर्यंत सर्वांना संरक्षण देण्याचे काम त्यांनी केले. नुकताच मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला आहे. परंतु खऱ्या अर्थाने मराठी भाषेला राजभाषेचा दर्जा देण्याचे काम



शिवरायांनी केले. ज्यावेळी अरबी आणि फारसी या शब्दावलीतून राज्यकारभार चालायचा तेव्हा छत्रपती शिवरायांनी स्वभाषेचा आग्रह धरुन मराठीचा वापर चालू केला. त्याचे पर्यायी मराठी शब्द लिहायला लावले. त्या प्रकारची नवीन आज्ञावली शिवरायांनी तयार केली, असे सांगून मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्याच्या पार्श्वभूमीवर दिल्ली येथे २१ फेब्रुवारी पासून अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन होत असल्याचे त्यांनी सांगितले. प्रारंभी शिवसृष्टी येथील स्वराज्य, स्वभाषा व स्वधर्म या त्रिसुत्रीवर आधारित दालन, गंगासागर व भवानी मातेच्या मंदीराला मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी रायगड किल्ल्यावरुन आणलेले जल मुख्यमंत्र्यांच्या हस्ते गंगासागर मध्ये अर्पण करण्यात आले. कार्यक्रमाला विविध मान्यवर तसेच शिवप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# जि.प.प्रा.रिधोरी शाळेत शिवजयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

जि.प.प्रा.शाळा रिधोरी, केंद्र टाकरवन, येथे छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी चिमुकल्या विद्यार्थ्यांनी शिवाजी महाराजांच्या कार्य कर्तृत्वावर भाषणे केली. तसेच मुलांनी व मुलींनी शिवाजी महाराज व जिजाऊंच्या गाण्यावर अप्रतिम नृत्य सादर केले. यावेळी मान्यवरांनी व सर्व ग्रामस्थांनी सर्व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. कार्यक्रमाला सरपंच गोपाळराव तौर, मुख्याध्यापक नानस्कर सर तसेच शिक्षिका सुरेखा कांबळे, शालेय समितीचे अध्यक्ष सतीश तौर, सोमेश्वर तौर, हनुमान तौर, गौतम तौर, गोटूराम तौर यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी ग्रामस्थ आणि पालक उपस्थित होते.

# शहरातील समस्या बाबत जिल्हाधिकारी डॉ.पांचाळ यांनी केली पहाणी

**जालना । प्रतिनिधी**

**जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ व जालना शहर महापालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर तसेच समस्त महाजन ट्रस्टचे पदाधिकारी यांनी आज इलेक्ट्रिक बाईक वरून जालना शहरातील विविध भागांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली.**

यावेळी शिवाजी महाराजांचा पुतळा पासून फुले मार्केट, सराफा बाजार, पाणी वेस येथील पाहणी केली. तसेच समस्त महाजन ट्रस्ट यांच्यामार्फत नदी रुंदीकरण व खोलीकरण करण्याच्या कामाची सुद्धा पाहणी केली. जालना शहर महानगरपालिकेच्या महात्मा फुले व्यापारी संकुल या ठिकाणी पार्किंग अतिक्रमण व हातगाड्याची मोठी समस्या आणि सदरील परिसरामध्ये अस्वच्छता दिसून आली, त्यामुळे संबंधित स्वच्छता निरीक्षक सहाय्यक आयुक्त अतिरिक्त आयुक्त यांना फुले मार्केट परिसर स्वच्छ ठेवण्यात यावा अशा सूचना दिल्या. याबाबत लवकरच बैठक लावून सदरील समस्याचे निराकरण करणे बाबत निर्णय घेण्यात येणार आहे. एस आर पी एफ आर पी टी एस येथील रस्त्याच्या बाजूचे वॉकिंग ट्रॅक याची पाहणी केली. यावेळी जिल्हाधिकारी यांनी शहराच्या विविध भागांमध्ये नागरिकांकरीता सीएसआर फंडामधून वॉकिंग ट्रॅक उपलब्ध करून देण्याबाबत आपण प्रयत्न करू अशा स्वरूपाचे आश्वासन दिले. जिल्हाधिकारी यांनी शहरातील विविध भागातील विकास कामे बाबत पाहणी करून माहिती घेतली. तसेच जालना महापालिकेमार्फत तयार होत असलेला सांडपाणी प्रक्रिया केंद्र/ एसटीपी



प्लांटला भेट देऊन झालेले कामकाज दर्जेदार करण्याच्या सूचना दिल्या. तसेच सदरील काम अत्यंत चांगल्या प्रकारे असल्याचे समाधान व्यक्त केले. या योजनेमुळे शहरातील सांडपाण्याचा प्रश्न मार्गी लागेल आणि शहर स्वच्छ होईल असेही म्हटले. आयुक्त यांनी माहिती दिली की सांडपाणी व्यवस्थापना अंतर्गत शहरातील नदीमध्ये ७७ ठिकाणी नाले येत असून, या ठिकाणी नाल्यावर जे चेंबरचे बांधकाम व गेट तयार करण्यात आले आहे. तेथील लोखंड हे काही समाजकंटक काँक्रीट तोडून त्यातील लोखंड काढत आहे. या संदर्भात आपण पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल केला आहे. सदरील प्लांट मुळे शहरात घाण पाणी हे नदीत न सोडता त्यावर ट्रीटमेंट केली जाणार असून यामुळे शहरातील डासांचा प्रश्न कायमस्वरूपी मार्गी लागणार आहे. यावर मा. जिल्हाधिकारी यांनी पोलिसांना याबाबत सूचना देण्यात येतील. जर कोणी असे करत असताना आढळले तर त्यांच्यावर जास्तीत जास्त कडक कारवाई करण्याबाबत पोलिसांना आदेश देण्यात येतील असे आश्वस्त केले.

# फुलसांगवी सेवा सोसायटीच्या वतीने छत्रपती शिवरायांना अभिवादन..



**शिरूर । प्रतिनिधी**

फुलसांगवी –मार्कडवाडी सेवा सोसायटीच्या वतीने चेअरमन बाळासाहेब खेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिवजयंतीचे आयोजन करण्यात आले होते यावेळी उपस्थित ग्रामस्थांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेला अभिवादन करून एकमेकास शुभेच्छा दिल्या आहेत.

फुलसांगवी –मार्कडवाडी सेवा सोसायटीच्या वतीने खंडोबा मंदिराच्या प्रांगणामध्ये शिवजयंतीच्या आयोजन करण्यात आले होते. चेअरमन बाळासाहेब यांच्या हस्ते शिवप्रतिमेचे पूजन करून पुष्पहार समर्पित करण्यात आला होता. यावेळी सेवा सोसायटीचे मार्गदर्शक नामदेव सानप, मोहनराव ढाकणे, अर्जुन (बप्पा) खेडकर, माजी सरपंच रमेश उत्तमराव तळेकर, प्रा. विष्णू सोनवणे, हौसराव जायभाये, आदींसह नारायण काजळे, बाबुराव सोनवणे, राजेंद्र सोनवणे, बबन तळेकर लक्ष्मणराव जायभाये, भरत सोनवणे, किरण सानप, कल्याण ढाकणे शंकर कोकाटे, वसंतराव सोनवणे आदींची उपस्थिती होती. यावेळी ग्रामस्थांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांना गुलाल पुष्प वाहून ग्रामस्थांच्या वतीने अभिवादन करण्यात आले होते

## पान १वरून...

### कॅबिनेटचा अजेंडा लिक

तेच आता आहेत. त्यामुळे तेच त्यावेळी कॅबिनेटचा अजेंडा लिक होत होता. आताही तेच लिक करत असल्याचा आरोप राऊत यांनी केला आहे.

------------

### पीएम किसान, नमोचा हप्ता आठवड्याच्या

निधीच्या ६ व्या हप्त्यासाठी पात्र ठरली आहेत. राज्यात पीएम किसानसाठी ९१ लाख शेतकरी पात्र ठरले होते. त्यामुळे नमोच्या ६ व्या हप्त्याचे वितरण या शेतकऱ्यांना करण्यात येणार असल्याची माहिती सुत्रांनी दिली आहे. निवडणुकीपूर्वी महायुती सरकारने विविध योजना राबवल्याने राज्य सरकारच्या तिजोरीवर भार पडलेला आहे. त्यामुळे पीएम आणि नमोचे मिळून १ हजार घेणाऱ्या शेतकरी महिलांना यापुढे लाडकी बहिण योजनेतून प्रतिमहा १ हजार ५०० ऐवजी ५०० रुपये देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात या दोन योजनेचा लाभ घेणाऱ्या महिला लाडकीतून वगळल्या जाण्याची शक्यता आहे.

--------------

### अंजली दमानिया यांचे पुन्हा अर्धवट

शासन निर्णय निर्गमित होत असतो. त्यामुळे खोटे बोलून जीआर काढला वगैरे असे म्हणणे म्हणजे निव्वळ हास्यास्पद, मीडिया ट्रायल करणे आणि आपल्या अर्धवट बुद्धीचे प्रदर्शन करणे असे आहे. अंजली दमानिया यांनी गेल्या पंधरा वर्षात ज्या काही मीडिया ट्रायल रन केल्या, ज्या कोणाविरुद्ध आरोप केले त्यातील एकही आरोप अद्याप कोणत्याही मा न्यायालयात अथवा इतरत्र कोठेही सिद्ध होऊ शकलेला नाही. त्याचेही कारण अर्धवट माहिती हाच असावा. मंत्रिमंडळाचा निर्णय झाला किंवा नाही असे भासवून निर्णय होत नाही, भासवून गोष्टी करण्यासाठी ती अंजली दमानिया यांची प्रेस कॉन्फरन्स आहे का, असा प्रश्नही धनंजय मुंडे यांनी उपस्थित केलाय! एखाद्या विषयास मंत्रिमंडळाच्या बैठकीत चर्चेअंती मान्यता झाल्यानंतर मंत्रिमंडळाच्या बैठकीचे इतिवृत्त हे माननीय मुख्यमंत्री महोदयांनी मान्य केल्यानंतर राज्यातील सर्वोच्च आयएएस अधिकारी असलेल्या माननीय मुख्य सचिव यांच्या स्वाक्षरीने निर्गमित केले जातात. मात्र दमानिया यांनी या प्रक्रियेची माहिती घेतली असती तर असे निराधार आणि धादांत खोटे विधान कदापि केले नसते. ऑफिस ऑफ प्रॉफिट पासून ते काहीही तथ्य नसलेल्या घोटाळ्यांचे कोणते तरी अर्धवट कागद समोर दाखवून त्याला पुरावा म्हणणे आणि मिडिया ट्रायल रन करणे हे अंजली दमानिया यांचा व्यवसाय झालेला आहे, त्यासंदर्भात त्यांच्याकडे काँक्रीट कागदपत्रे असल्यास त्यांनी न्यायालयात जावे, आता न्यायालयामध्ये आम्ही देखील त्यांना योग्य तो धडा शिकवू, असेही धनंजय मुंडे म्हणालेत. फर्टीलायझर कंट्रोल ऑर्डर हा केंद्र शासनाचा कायदा आहे, त्यानुसार विशिष्ट प्रमाणपत्र धारण केल्याशिवाय व खत निर्माता कंपनीने प्राधिकृत केल्याशिवाय कोणालाही खतांची विक्री करता येत नाही. यासंदर्भात ने संबंधित कंपन्यांना २०२२ व २०२३ मध्ये सुद्धा नोटीस दिलेल्या आहेत. पण आपल्या सोयीचे तेवढे बोलायचे आणि अर्धवट ज्ञान प्रदर्शन करणे हे धोरण फक्त बदनामीसाठी आहे. सदर कंपन्या या आमची उत्पादित खते विकण्यास प्राधिकृत नाहीत, फर्टीलायझर कंट्रोल ऑर्डर मधील तरतुदींप्रमाणे ओ प्रमाणपत्र असल्याशिवाय अशी खते विकता येत नाहीत, अशा प्रकारची प्रेस रिलीज आमचे स्वीय सहाय्यक यांनी नव्हे तर स्वतः इफकोने याआधीच काढलेली आहे, तसेच ती आजही चा संकेत स्थळावर उपलब्ध आहे. अंजली दमानिया यांना देखील ही बाब समजत असावी, मात्र तरीही खोटे बोल पण रेटून बोल, असा उद्योग त्यांनी चालवला आहे.

-----------

### जल्लोष शिवजयंतीचा! बीडमध्ये

शिवप्रेमींनी या कार्यक्रमाचा मनमुक्त आनंद घेतला. आ.संदीप क्षीरसागरांनीही ढोल–ताशांच्या आणि शिवगीतांवर ठेका धरला होता. हे पाहून तरुणाई भारावली होती. या कार्यक्रमास बीड शहरासह ग्रामीण भागातील सर्व क्षेत्रातील मान्यवर, लाखो शिवप्रेमी नागरिक उपस्थित होते.

**असे होते सांस्कृतिक कार्यक्रम**

करवीर नाद ढोल पथकाच्या तब्बल ४५० कलाकारांचे सादरीकरण, तिबेटीयन मॉंक यांचे शाओलीन मार्शल आर्ट या चित्तथरारक साहसी खेळाच्या सादरीकरणाने प्रेक्षकांच्या काळजाचा ठोका चुकवला., पश्चिम बंगाल येथील 'रायबिशी आर्ट स्कूल' नावाच्या पथक ऍक्रोबाईक्स फाईट आणि वेगवेगळे चित्त थरारक प्रात्यक्षिके सादर केली., ओडिशा राज्यातील 'दुलदुली बाजा' नावाचे आदिवासी वाद्य पथकाने आपली लोकनृत्य सादर केले., आंतरराष्ट्रीय दर्जाच्या लाईट आणि लेजर शो–ने प्रेक्षकांचे लक्ष वेधले.

----------

### आ.विजयसिंह पंडित यांच्या तगड्या

तहसिलदार संदिप खोमने, अभिनेते प्रकाश धोत्रे, महेश कोकाटे, डॉ. राजेश आहेर, रमेश रोकडे, दिग्दर्शक महेंद्र महाडिक यांच्यासह समितीचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्ष संदिप मडके, युवानेते रणविर पंडित यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते व शिवप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दिपप्रज्वलन, शस्त्रपुजन, मुख्य रंगमंच पुजन, अश्वपुजन आणि श्री गणेशाची आरती करुन महानाट्याच्या शुभारंभ शोला प्रारंभ झाला.

**छत्रपती शिवाजी महाराजांचे विचारसामान्य माणसापर्यंत नेण्याचे काम विजयसिंह पंडित यांनी केले–जिल्हाधिकारी अविनाश पाठक**

आ. विजयसिंह पंडित यांनी शिवजन्मोत्सव सोहळा व महानाट्याचे सातत्याने यशस्वी आयोजन करुन शिवाजीमहाराजांचे विचार सामान्य माणसापर्यंत घेऊन जाण्यासाठी प्रामाणिकपणे प्रयत्न केला आहे. राजा कसा असावा याचा आदर्श पुढच्या पिढीला कळावा हाच उद्देश त्यांचा आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघात यामुळे उत्कृष्ट वातावरण तयार झाले असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

**गेवराई शहरात शिवरायांचे स्मारक तसेच अश्वारूढ पुतळा उभारणार–आ. विजयसिंह पंडित**

यावेळी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, शिवरायांचे आठवावे रुप, आठवावा प्रताप यासाठी या महानाट्याचे आयोजन केले आहे. शिवरायांचा इतिहास पुढील पीढीला सांगण्यासाठी हा शिवजन्मोत्सव सोहळा आयोजित केला जातो. येणाऱ्या काळात शिवरायांचे स्मारक आणि अश्वारुढ पुतळा गेवराई शहरात उभारला जाईल अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. शिवजन्मोत्सवानिमित्त छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवन कार्यावर आधारित शिवशाही या ऐतिहासिक महानाट्याचा तीन प्रयोग शिवजन्मोत्सवानिमित्त विनामुल्य आयोजन करण्यात आले आहे. शुभारंभाचा पहिला प्रयोग सर्वांसाठी असुन गुरुवार दि. २० रोजीचा प्रयोग केवळ महिलांसाठी आणि शुक्रवार दि. २१ रोजीचा प्रयोग शालेय विद्यार्थ्यांसाठी आयोजित केला असल्याचे सांगून सर्व शोचा आनंद सर्वांनी घ्यावा असे आवाहन विजयसिंह पंडित यांनी यावेळी केले.

**नेत्रदीपक रंगमंचावर ऐतिहासिक प्रसंगांनी उपस्थित रसिक भारावले**

पाच मजली किल्ल्याची हुबेहुब प्रतिकृती, शोभीवंत सिंहासन मेघडंबरी, जहाजाचा वापर करुन महाराजांच्या कोकण मोहिमेचा जिवंत देखावा, भव्य राज्याभिषेक सोहळा, शिवकालीन शस्त्रास्त्रे व युद्ध साहित्य यासह अधुनिक ध्वनी व प्रकाश योजना, घोडे, बैलगाडी, पालखी, नेत्रदिपक अतिषबाजी यांचा वापर करुन मराठा व पातशाही यांच्या तलवारींचा खणखणाट, तोफांचा गडगडाट, अग्नीबाणांचा वर्षाव असा घनघोर रणसंग्राम पाहून उपस्थित रसिक आणि शिवप्रेमी नागरिक भारावले

**बाजारतळ येथे शिवरायांना अभिवादन**

राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती व नगर परिषद, गेवराई यांच्या संयुक्त विद्यमाने सकाळी गेवराई शहरातील बाजार तळ येथे छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन करण्यात आले. यावेळी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज बाल उद्यानाचे लोकार्पण भवानी अर्बन बँकेचे अध्यक्ष बप्पासाहेब मोटे यांच्या शुभहस्ते तर आ. विजयसिंह पंडित यांच्या प्रमुख उपस्थित करण्यात आले. यावेळी जयभवानी सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष अमरसिंह पंडित, शारदा स्पोर्ट्स ॲकडमीचे अध्यक्ष रणवीर पंडित, राष्ट्रवादी सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळ्याचे अध्यक्ष शैलेश तोष्णीवाल, कार्याध्यक्ष संदिप मडके, सहकार्याध्यक्षप्पदी संतोष सुतार, उपाध्यक्षपदी ॲड मनोज हजारे, स्वप्निल मोटे, अमजद शेख, बंटी सौंदरमल सचिवपदी राहुल मस्के, सहसचिवपदी शहादेव निकम, कोषाध्यक्षपदी पप्पू पठाण, सह कोषाध्यक्षपदी रणजित घुंबार्डे यांची तर कार्यकारणी सदस्य म्हणून प्रभाकर भालशंकर, प्रदीप सुतार, धीरज गळगुंडे, मयूर गव्हाणे, वसीम फारोकी, सुभाष गुंजाळ, जयसिंग माने, अशोक बेद्रे, संजय दाभाडे, कमलाकर हातागळे, सादिक शेख, विशाल हुंबे, मोहसीन बागवान यांच्यासह शिवप्रेमी नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. २० फेब्रुवारी २०२५


## महाशिवरात्रीनिमित्त संगमेश्वर संस्थान येथे अखंड हरिनाम सप्ताह

**बीड । प्रतिनिधी**

तालुक्यातील श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान राळेसांगवी येथे वर्ष २१ वे महाशिवरात्री महोत्सवानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व शिव महापुराण कथाचे आयोजन करण्यात आले आहे त्या कार्यक्रमाचा प्रारंभ मच्छिंद्रगडाचे मठाधिपती स्वामी जनार्दन महाराज यांच्या हस्ते आज गुरुवार ( ता.२०) रोजी पुष्पवृष्टीच्या कार्यक्रमाने होत आहे.

श्री क्षेत्र संगमेश्वर संस्थान राळेसांगवी येथे अखंड हरिनाम सप्ताह संत वामन भाऊ महाराज, संत भगवान बाबा, व संत निगमानंद महाराज यांच्या आशीर्वादाने व मच्छिंद्र गडाचे मठाधिपदी महंत स्वामी जनार्दन महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहात दैनंदिन कार्यक्रम काकडा भजन, विष्णुसहस्त्रनाम, शिवलीलाअमृत पारायण, गाथा भजन ,हरिपाठ, हरिजागर या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. तर संगीतमय शिव महापुराण कथा रामेश्वर महाराज शास्त्री ब्रम्हनाथ येळम यांचे होणार आहे या सप्ताहात स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगड, लक्ष्मण महाराज राळेसांगवीकर, रामदास महाराज शास्त्री भगवानगड ,नारायण महाराज शास्त्री केंद्रे नांदेड ,विवेक महाराज शास्त्री भगवानगड ,गणेश महाराज खेडकर आळंदी, प्रसाद महाराज शास्त्री भगवानगड, नवनाथ महाराज शास्त्री भालगाव यांचे कीर्तन होणार आहे तर गुरुवार (ता.२७) रोजी स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर यांचे काल्याचे किर्तन होणार आहे नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहात प्रसिद्ध गायनाचार्य हार्मोनियम वादक उपस्थित राहणार आहेत तसेच योगाचार्य भारत ठोंबरे सर, अर्चना ठोंबरे यांच्या योगाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी सप्ताहाचा लाभ भाविक भक्ताने घ्यावा अशी आव्हान राळेसांगवी नांदेवाली निमगाव( मांयबा) येथील ग्रामस्थांनी केली आहे.

# शिवछत्रपतींचा आदर्श भावी पिढीने चालवावा यासाठी ही पदयात्रा - जिल्हाधिकारी पाठक




बीड । प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक शिवछत्रपतीं एक आदर्श राजे होते, कर्तव्यदक्ष प्रशासक होते. प्रसंगी कठोर न्यायाधीश होते.आदर्श व्यक्तिमत्व होते.जितके कठोर तितकेच प्रजेप्रती प्रेमळ आणि मायाळू असलेले राजे शिवछत्रपती आपणास लाभले हे आपले भाग्य आहे. त्यांच्या आदर्श विचारांचा वारसा आपण चालवत आहोत तो पुढे पुढच्या पिढीने समर्थपणे चालवावा यासाठीच आज महाराजांच्या ३९५ व्या जयंतीनिमित्त संविधानाची शपथ घेऊन आपण पदयात्रा काढत आहोत असे मत व्यक्त करून जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी शिवजयंतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा दिल्या.

या निमित्ताने आज साऱ्या बीड मध्ये जय छत्रपती शिवाजी महाराज-जय भारत चा निनाद झाला. बीड येथील श्रीमंतयोगी छत्रपती शिवाजी महाराज स्टेडियम येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३९५ व्या शिवजयंती निमित्त भव्य पदयात्रा काढण्यात आली. या पदयात्रेला हिरवा झेंडा दाखवून जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी प्रारंभ केला.यावेळी उपजिल्हाधिकारी शैलेंद्र सूर्यवंशी, बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आदित्य जीवने, पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत, जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, नेहरू युवा केंद्राचे प्रमोद जव्हेरी, स्काऊट गाईडचे योगेश आवडाळ, उपशिक्षणाधिकारी काकडे, हजारे, विस्तार अधिकारी रघुनाथ राऊत भगवानराव सोनवणे सामाजिक कार्यकर्ते तत्त्वशील कांबळे पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी आदी मान्यवरांच्या उपस्थितीमध्ये बीड शहरातून भव्य दिव्य जनजागृती प्रित्यर्थ पदयात्रा काढण्यात आली. यावेळी मनोगत व्यक्त करताना जिल्हाधिकारी अविनाश पाठक म्हणाले, रयतेप्रति आपुलकी असलेला राजा आपल्याला लाभला आणि राजावर प्रेम कसं करावं तो आदर्श या मातीतील प्रजेने सिद्ध केलं. त्यांनी सर्व जाती धर्मांना समान वागणूक देत खऱ्या अर्थाने जनतेचे आदर्शवत राज्य निर्माण केले. तोच आदर्श आज आपली पिढी समर्थपणे चालवत आहे. पुढच्या पिढीने हाच वारसा पुढे समर्थपणे चालवावा यासाठीच राजे शिवछत्रपतींची ३९५ जयंती आपण मोठ्या उत्साहाने साजरी करत आहोत. जयंतीनिमित्त आज संविधानाची शपथ घेऊन आपण भव्य पदयात्रा काढत आहोत. सर्वांनी छत्रपतींचा आदर्श कायम आपल्या जीवनात अंगीकारावा आणि सामाजिक सलोखा जपावा असे आवाहन बीडचे जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना केले.

या पदयात्रेचा समारोप छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण येथे सकाळी १०:३० वाजता मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला. या पदयात्रेमध्ये बीड शहरातील विविध शाळेतील विद्यार्थी विद्यार्थिनी, शासनाच्या विविध विभागातील कर्मचारी,अधिकारी, सामाजिक कार्यकर्ते, वकील, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त मोफत व्यसनमुक्ती शिबीर-डॉ.राजेश इंगोले



अंबाजोगाई प्रतिनिधी

कुळवाडीभूषण छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त समाधान मानसोपचार रुग्णालय व व्यसनमुक्ती केंद्र इथे मोफत व्यसनमुक्ती शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

सुप्रसिद्ध मानसोपचार तथा व्यसनमुक्ती तज्ञ डॉ राजेश इंगोले यांनी या शिबिराचे आयोजन केले होते. या शिबिरात अंबाजोगाई आणी परिसरातील व्यसनी व्यक्ती आणि त्यांच्या नातेवाईकांसोबत डॉ राजेश इंगोले यांनी खुल्या चर्चासत्रअंतर्गत व्यसने,व्यसनमुक्ती याबाबत प्रदीर्घ चर्चा करीत रुग्णांचे समुपदेशन केले. यावेळी मार्गदर्शन करतांना डॉ राजेश इंगोले यांनी दारू, गांजा, तंबाखू, गुटखा, मावा, खर्रा ही व्यसने माणसाला हळूहळू आपल्या अधीन करतात आणि सुरवातीला केवळ गंमत म्हणून घेतलेली ही व्यसने त्या माणसाची कधी गरज बनतात हे त्या व्यक्तीलाही उमगत नाही. त्यामुळे मला व्यसनाची सवय नाही मी उगी मित्रांसोबत एन्जॉय म्हणून घेतो ,हे सांगणारा माणूस खोटे बोलत असतो हे स्पष्ट केले. व्यसने ही हळूहळू मेंदूच्या पेशींचा ताबा घेतात आणि ठराविक वेळेला त्या व्यसनाची तल्लफ व्हावी म्हणून मेंदूला प्रेरित करतात. त्यामुळे दिवसाच्या ठराविक वेळेला व्यसनी लोकांना तो पदार्थ खायला किंवा प्यायला मिळाला नाही तर बेचैनी, थरथर, मळमळ, अस्वस्थ वाटणे, झोप न येणे, अशी विविध प्रकारचे लक्षणे त्या व्यक्तीच्या शरीरात दिसून येतात. या लक्षणांपासून मुक्तता मिळवण्यासाठी व्यसनी रुग्ण अजून व्यसनाधीन बनत जातो हे चक्र आयुष्यभर चालत राहते. त्यामुळे व्यसने जशी जुडतात तशीच ती सोडवली जाऊ शकतात. काही औषधोपचार आणि मानसिक समुपदेशन तसेच सुरवातीच्या काळातील विथड्रॉल सिन्ड्रोम व्यवस्थित मॅनेज केला तर रुग्णास व्यसन सोडल्या सोडल्या होणार त्रास होत नाही आणि त्याच्या व्यसने सोडण्याचा आत्मविश्वास निर्माण होतो. त्यामुळे व्यसने ही निश्चितपणे डॉक्टर्सच्या औषधोपचार आणि रुग्णाच्या मनोनिग्रहामुळे हमखास सुटू शकतो असे ठाम वक्तव्य डॉ राजेश इंगोले यांनी या शिबिरात केले. यावेळी पंचावन्न रुग्णांना तपासून त्यांना व्यसनमुक्ती करिता मोफत औषधोपचार करण्यात आला.व्यसनमुक्ती शिबिराच्या यशस्वीतेसाठी डॉ प्रज्ञा इंगोले, सुरेखा सिरसाट,मयूर गायकवाड, गोविंद गायकवाड,प्रतीक सिरसाट, वाजेद शेख, सचिन साळवे,अर्जुन शिंदे, अजित आव्हाड, अक्षय इंगोले, प्रयोगशाळा तंत्रज्ञ विशाल अंबड, मनोज इंगोले, तुषार मनवर, समता इंगोले, शेख बाबा, गौतम घनघाव यांनी परिश्रम घेतले.यावेळी आलेल्या रुग्णांनी आणी त्यांच्या नातेवाईकांनी डॉ राजेश इंगोले यांचा सहृदय सत्कार करीत त्यांचे आभार मानले.



## शिवजयंतीनिमित्त किल्ले बनवणे स्पर्धा व वृक्षारोपण संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील जयहिंद ग्रुपच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांसाठी किल्ले बनवणे स्पर्धा व वृक्षारोपण कार्यक्रम संपन्न झाला मान्यवरांच्या उपस्थितीत वृक्षारोपण करून शिवरायांना वृक्षवंदना देण्यात आली. जवळपास २५ विद्यार्थिनींनी विविध किल्ल्याच्या आकर्षक प्रतिकृती बनविल्या होत्या. योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष सी.एल. बर्दापूरकर यांनी उपक्रमाचे कौतुक केले तर मुख्याध्यापिका परोपकारी यांनी विद्यार्थिनींना प्रोत्साहन दिले.

कार्यक्रमासाठी जयहिंद ग्रुपचे कुलकर्णी,सांस्कृतिक विभाग प्रमुख दत्ता बनसोडे, पदाधिकारी एस.बी.शिंदे, मसने,संतोष चौधरी,वैभव चौसाळकर यांनी परीश्रम घेतले.

## कर्माचे भोग हे भोगावेच लागतात-राहुल महाराज



जालना । प्रतिनिधी

कर्माचे भोग हे भोगावेच लागतात. ते कोणालाही सुटलेले नाही. मग कर्म करणार्याला वाटत असेल की, माझ्याकडे कोणीही पाहत नाही. परंतू हे चुकीचे आहे. असा हितोपदेश हभप राहुल महाराज जोशी यांनी येथे बोलतांना दिला. दरम्यान, आज रात्री हभप त्रिंबक महाराज दस्तापूरकर यांचे हरिकिर्तन होणार आहे.

श्री. जोशी महाराज सहकार बँक कॉलनीत आयोजित अखंड हरिनाम सप्ताहानिमित्त आयोजित केलेल्या भागवत कथेचे सहावे पुष्प गुंफतांना ते बोलत होते. पुढे बोलतांना ते म्हणाले की, शेवटी कंसाचे खुप हाल झाले. त्याला मारणारा दुसरा तिसरा कोणी नसून खुद्द भगवान परत्मा कृष्ण होते. कंसाच्या दशा आपण पाहिली आहे, ऐकली आहे. म्हणूनच भक्ती करावी तर भगवान परत्मा श्री कृष्णाची करावी, यावेळी जोशी महाराजांनी गायिलेल्या भजनाला श्रोत्यांनीही भरभरुन प्रतिसाद दिला. छोटी छोटी गया छोटे- छोटे गॉल याच बरोबर त्यांनी यावेळी अनेक भजनं गायिली.

कीर्तन सेवेत आज हभप श्री रसाळ महाराजांनी यांनी जगतगुरु संत तुकाराम महाराजांच्या अंभगावर निरुपन केले. ते म्हणले की, आज काल सुख कोठे आहे, तर ते फक्त भगवंतांच्या भक्तीमध्ये आहे. म्हणूनच भगवंत भक्तीचा विसर पडू देऊ नका, असेही रसाळ महाराज म्हणाले.

यावेळी विश्वस्त मंडळचे सचिव श्री संपतराव पाटील, मंडळाचे अन्य पदाधिकारी व कॉलनी भाविकांसह हभप शिरीष सांगोळे, तुकामरा मुंडे, आत्माराम बिडवे आदींची उपस्थिती होती.

**उद्या समाप्ती**

दरम्यान, या सप्ताहाचा उद्या शुक्रवारी सांगता सभारंभ होणार आहे. काल्याचे किर्तन हभप डॉ. भगवान महाराज आनंदगडकर महाराज यांचे होईल. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. तत्पूर्वी संपूर्ण कॉलनीतून पालखी (दिंडी) सोहळा निघणार आहे. या सर्व कार्यक्रमांचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

पान ६ वरून...

### मधुकर महाराज खाडे यांचे

परिसराला सहज उपलब्ध होतात. ही खाडे महाराज यांची कृपा आहे. पैलवान मंडळी कधी झुकत नाहीत. अगदी शेवटपर्यंत त्यांनी हा बाणा जपला. तसेच, अर्जुन महाराज लाड यांच्याप्रती असलेली श्रध्दा, निष्ठा कायम ठेवली. त्यांचा आणि काम, क्रोधाचा दुरान्वये संबंध नव्हता, म्हणून ते लोकप्रिय व्यक्तीमत्व बनले, असे मत ढाकणे महाराज यांनी व्यक्त केले. यावेळी होळचे ग्रामस्थ, संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे पदाधिकारी, आजी-माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### फुलसांगवी ग्रामपंचायतच्या

थाटात आयोजन करण्यात आले होते. बुधवार दि. १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची बँड पथकाचे वादनामध्ये गावभर मिरवणूक काढण्यात आली. या कार्यक्रमासाठी सरपंच भास्कर सानप यांनी विशेष घेऊन सर्व जाती धर्मातील लोक एकत्रित करत जयंती उत्सव साजरा करून जिल्ह्यामध्ये आदर्श निर्माण केला. यावेळी तरुण बांधवांच्या वतीने गुलालाची उधळण करत छत्रपती शिवाजी महाराज की जय असा जयघोष ही करण्यात आला. या मिरवणुकीमध्ये मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते. मी नंतर श्री.संत वामनभाऊ महाराज मंदिरामध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांना विराजमान करून सरपंच भास्करराव सानप यांच्या हस्ते छत्रपतींच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी उपसरपंच आदिनाथ तळेकर, सदस्य अंकुश गर्जे, हनुमान सोनवणे, शाहिनाथ जायभाये, किरण तळेकर, गणेश लोखंडे, ग्रामसेवक भरत सानप आदी ग्रामपंचायतच्या पदाधिकाऱ्यांसह माजी सरपंच सखाराम तळेकर, माजी सरपंच रमेश शंकर तळेकर, परमेश्वर तळेकर, किसन लोखंडे, गणेश (अण्णा) तळेकर, राजेंद्र काकडे, डोंगरे सर, अनंता तळेकर, जगन्नाथ मार्कड, महादेव बडे, उमेश खेडकर, गोपाल सोनवणे, कबीर सोनवणे विठ्ठल उगले, श्रीमंत तळेकर, सुनील काकडे भगवानराव तळेकर, अशोक तळेकर, पांडुरंग झगळे भाऊसाहेब तळेकर, नारायण काकडे कृष्णा तळेकर, प्रकाश ढवळे आदींची उपस्थिती होती.

पान ६ वरून...

### या भूमंडलावर स्वत:च्या

२७ एप्रिल रोजी रायरेश्वर मंदिरात जाऊन स्वराज्याची शपथ घेतली.रायरेश्वर किल्ला स्वराज्याच्या शपथेचा साक्षीदार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी शूर तरुणांचा एक गट तयार करून हिंदवी स्वराज्य केले.या मूठभर मावळ्यांच्या मदतीने त्यांच्यात धर्मप्रेम निर्माण केले.अवघ्या पन्नास वर्षांच्या कालावधीत त्यांनी विजापूर आणि दिल्लीच्या राजांना आपल्यापुढे झुकवले. हिंदू धर्माला हक्काचा राजा मिळाला.

सर्वश्रेष्ठ राजाची ओळख त्याच्या स्वत:च्या आपल्या पराक्रमामुळे असते,त्याने आपले स्थान किंवा राज्य स्वबळावर निर्माण केलेले असते., तो स्वतः मृगेंद्र म्हणजेच शेरांचा राजा किंवा सर्व राजांचा राजा म्हणून ओळखला जातो.नाभिषेको न संस्कारः सिंहस्य क्रियते वने ।विक्रमार्जितसत्त्वस्य स्वयमेव मृगेंद्रता।।‘‘*

या कार्यक्रमाचे अध्यक्षीय समारोप मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर म्हणाले

मराठा साम्राज्याचे छत्रपती झाले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या शिस्तबद्ध आणि सुव्यवस्थित प्रशासकीय घटकांच्या मदतीने एक कार्यक्षम प्रगतीशील प्रशासन स्थापन केले. जलव्यवस्थापन,युध्द नीती,गड व्यवस्थापनामध्ये तर ते एक उत्तम अभियंतेच होते.त्यांच्यामुळेच आपण हा उत्सव संपन्न करत आहोत. प्रास्ताविक अभ्यासपूरक मंडळ प्रमुख श्रीमती अंजली वाघमारे, आभार व सुत्रसंचलन अशोक म्हेत्रे यांनी केले, कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने झाली कल्याण मंत्र विजयकुमार सोन्नर यांनी सांगितला. यावेळी सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

### शालेय साहित्य वाटप करून

कार्यकर्ते कैलास जावळे हे महापुरुषांच्या विचारांना अनुसरून अशी प्रत्येक महापुरुषांची जयंती साजरी करतात यावेळी सुद्धा त्यांनी तीच सामाजिक बांधिलकी जोपासत अखंड महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त त्यांनी सुकळी येथील शिवारात असणाऱ्या माळेगाव हायस्कुल माळेगाव मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करत महापुरूषांच्या विचारांना अभिप्रेत अशी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करत त्यांना अभिवादन केले.यावेळी मुख्यध्यापक एस.एम लोकरे,शिक्षक कर्मचारी ए.एस जाधव,एस.आर सारूक,एस.बी गुजर,एम.एम लामतुरे,एम.एस फुंदे,जी.जे कदम,डि.वाय नागरगोजे,बी.बी भोसले,ए.डी इतापे व विद्यार्थी उपस्थित होते.

### संजय गांधी विभागातील

केली असून याबाबत शेतकरी कामगार पक्षाचे शिष्टमंडळ लवकरच जिल्हाधिकारी तसेच विभागीय आयुक्त यांची भेट घेऊन संजय गांधी विभागातील बेकायदेशीर लाभार्थ्यांच्या यादी चा पाढा वाचणार असल्याचे आवाहन शेतकरी कामगार पक्षाचे नेते भाई ॲड नारायण गोले पाटील यांनी केले तसेच पात्र लाभार्थ्यांना वगळणाऱ्या व त्यांना योजनेपासून कोसो दूर ठेवणाऱ्या संबंधित अधिकारी व तहसीलदार यांचे निलंबन करण्यासाठी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे देखील तक्रार करणार असल्याचे त्यांनी सांगितले यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे भाई मुंजा पांचाळ, श्रीराम कोरडे श्रीराम शेवाळे,जनार्दन कुदळे,सोनाजी जाधव,साळुंजी हांडे,चांगदेव शेजुळ,सतीश शेजुळ,अशोक कुलकर्णी विष्णू शेळके,लक्ष्मण आप्पा चव्हाण आदींची उपस्थिती होती.

### दादाराव कराड विद्यालयात

कर्तृत्वाचा ऐतिहासिक पट उलगडून सांगितला

कविता केकान, ज्योती केंद्रे,दीप्ती सूर्यवंशी,ए. एस.नागरगोजे यांनीही मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय समारोपात शिवरायांसारखी धैर्यशील व कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्वे घडवणे ही प्रत्येक पालक आणि शिक्षकांची जबाबदारी आहे असे सांगुन सर्वांचे कौतुक केले. शैक्षणिक वर्ष २०२४ - २५ चा आदर्श शिक्षक पुरस्कार पी.एस. घुले,श्रीमती एस. व्ही.वाघमारे यांना प्रा. रामराजे कऱ्हाड यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. संचालन प्रणिल चोटपगार यांनी तर तन्मय शेप यांनी आभार मानले.यावेळी शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

### आजपासून श्रीक्षेत्र

८ ते १२ श्री.संत तुकाराम महाराज गाथा पारायण,१२ ते २ भोजन,३ ते ५ प्रवचन,५ ते ६ हरिपाठ तसेच हरिकिर्तन रामायण कथा रात्री ९ ते ११,रात्री ११ ते ४ हरिजागर,संगीत भजन,भारुड कार्यक्रम तसेच गुरुवार दि.२७/०२/२०२४ रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन होऊन ह.भ.प.गुरुवर्य महंत श्रीश्री १००८ स्वामी महादेवानंद भारती महाराज यांचे काल्याचे किर्तन होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होईल.गुरुवार (दि.२०) ह.भ.प.नारायण महाराज बजगुडे अश्वत्थलिंग संस्थान यांचे प्रवचन व किर्तन,शुक्रवार (दि.२१) ह.भ.प. सखाराम महाराज ढास मुळुक यांचे प्रवचन,तर ह.भ.प.शिवानंद भारती महाराज दत्त संस्थान तांबाराजुरी यांचे किर्तन,शनिवार (दि.२२) ह.भ.प. महादेव साबळे सर साबळेवाडी यांचे प्रवचन,तर ह.भ.प.दत्ता महाराज बेदरे यांचे किर्तन,रविवार (दि.२३) ह.भ.प. शिवानंद भारती महाराज यांचे प्रवचन तर ह.भ.प.साक्षीताई म्हस्के यांचे किर्तन,सोमवार (दि.२४) ह.भ.प. अनंत मुळे काका लिंबागणेश यांचे प्रवचन तर ह.भ.प.अशोक महाराज भोसले पारगाव जोगेश्वरी यांचे किर्तन, मंगळवार (दि.२५) ह.भ.प.भागवत कापसे सर (चंद्रेवाडी) यांचे प्रवचन तर ह.भ.प.परमानंद भारती महाराज अश्वत्थलिंग संस्थान यांचे किर्तन, बुधवार (दि.२६) ह.भ.प.भास्कर महाराज वाघाचा वाडा यांचे प्रवचन तर ह.भ.प.गुरुवर्य स्वामी महंत महादेवानंद भारती महाराजांचे किर्तन होईल.

# विद्यार्थ्यांचे परिश्रम,जिद्द व शिक्षकांचे यशस्वी मार्गदर्शन यामुळेच संस्थेची यशस्वी परंपरा कायम- संकेत मोदी

## दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय क्रीडा व सांस्कृतिक स्पर्धेत मानव विकास मूकबधिर विद्यालयास सर्वसाधारण विजेतेपद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गेवराई येथे दिव्यांगांच्या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा नुकत्याच संपन्न झाल्या. या स्पर्धेत संपूर्ण बीड जिल्ह्यातील दिव्यांग शाळा सहभागी झाल्या होत्या. या क्रीडा स्पर्धेत मूकबधिर प्रवर्गातुन अंबाजोगाई येथील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाच्या मानव विकास मूकबधिर विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सर्वसाधारण विजेतेपद मिळवत आपल्या संस्थेच्या यशाचे सातत्य कायम ठेवले आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचा सत्कार व गुण गौरव संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्यांनी संस्थेतील विद्यार्थ्यांचे परिश्रम , जिद्द व त्याबरोबरच शिक्षकांचे योग्य मार्गदर्शन यामुळेच संस्थेची यशस्वी परंपरा कायम राहिली असल्याचे मत व्यक्त केले.

स्पर्धेत सहभागी झालेल्या मूकबधिर विद्यार्थ्यांमध्ये स्वप्निल सूर्यवंशी, सुरज माने,ओम ठाकरे, संस्कार कांबळे, नंदिनी अग्रवाल, अंशिका हातागळे या विद्यार्थ्यांचा समावेश होता. लांब उडी, दोनशे मीटर धावणे, गोळा फेक, ४०० मीटर धावणे अशा विविध प्रकारच्या स्पर्धाचे आयोजन दिव्यांगांच्या या जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत करण्यात आले होते. वयोगट निहाय गोळा फेक स्पर्धेत प्रथम क्रमांक ओम ठाकरे याने तर संस्कार कांबळे याने लांब उडी स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला . त्याचबरोबर पूजा बळी, ओंकार सूर्यवंशी हर्षदा चाटे यांनी तृतीय क्रमांक पटकावला. या संपूर्ण स्पर्धेत मूकबधिर विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांकाची दोन ,द्वितीय दोन तर तृतीय क्रमांकाची तीन पारितोषिके पटकावत जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत सर्वसाधारण विजेतेपद मिळवले. मानव विकास मतिमंद विद्यालयातील विद्यार्थी शेख इब्राहिम निजामुद्दीन याने मतिमंद प्रवर्गात लांब उडी स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवला तर मानव विकास अपंग विद्यालयातील विद्यार्थी गंगाधर जाधव व राहुल मस्के यांनी अस्थिव्यंग प्रवर्गात १०० मीटर धावणे व २५ मीटर कुबडीवर धावणे या क्रीडा प्रकारात द्वितीय क्रमांक संपादन केला . जिल्हास्तरीय सांस्कृतिक महोत्सवात मानव विकास मूकबधिर विद्यालयाने हिना या चित्रपटातील ‘‘देर ना हो जाए‘‘ या गीतावर आपले उत्कृष्ट असे समूहनृत्य सादर करून प्रथम क्रमांक मिळवला.जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेच्या निमित्ताने शिक्षकांसाठी आयोजित केलेल्या सामान्य ज्ञान स्पर्धेत मानव विकास मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक आप्पासाहेब चव्हाण यांनी जिल्हास्तरीय द्वितीय क्रमांक संपादन केला.



श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ हे आपल्या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांना क्रीडा, शैक्षणिक, सांस्कृतिक व सामाजिक प्रवाहात आणून त्यांच्यातील सुप्त कलागुणांना वाव देण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न करत असते. विद्यार्थ्यांचे परिश्रम व जिद्द आणि शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच क्रीडा स्पर्धेतील अजिंक्यपदाचे सातत्य व परंपरा कायम राहिली असल्याची भावना यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक करतांना श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केली. त्याचबरोबर समाजातील उपेक्षीत घटकांना क्रीडा व सांस्कृतिक शिक्षण देऊन त्यांना स्वत:च्या पायावर उभे राहता येईल यासाठी येथील शिक्षक हे विशेष असे परिश्रम घेत असल्याचे संकेत मोदी यांनी सांगितले. विद्यालयातील विद्यार्थ्यांचे परिश्रम व जिद्द तसेच त्यांना वेळोवेळी मिळणारे शिक्षकांचे मार्गदर्शन यामुळेच क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात संस्थेच्या विद्यार्थ्यांचे यश मिळवण्याचे सातत्य टिकुन आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांमुळेच विद्यालयाचे नाव शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रात आघाडीवर येऊन संस्थेचे नाव राज्यस्तरावर उज्ज्वल होत असल्याचा अभिमान संकेत मोदी यांनी याप्रसंगी व्यक्त केला. यापुढेही विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था सदैव प्रयत्नशील राहिलअसे संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत राजकिशोर मोदी यांनी आवर्जून नमूद केले.

सर्व यशस्वी विद्यार्थ्यांना मुख्याध्यापक आनंद टाकळकर, विशेष शिक्षक व विभाग प्रमुख दिलीप साठे, डी. बी. शिंदे, श्रीमती वर्षाराणी भालकीकर पवार, बी. ए. नांदुरकर, आबेद पठाण, राजेंद्र वाघमारे, विजय कोंबडे, राजेंद्र कसबे यांनी मार्गदर्शन केले आहे.

जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धेत यशस्वी सर्व विद्यार्थ्यांचे संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, प्रा. डॉ. बी.आय. खडकभावी, अध्यक्ष भूषण मोदी, जिल्हा समाज कल्याण अधिकारी श्रीमती मेश्राम मॅडम, वैद्यकीय सामाजिक कार्यकर्ता अंकुशराव नखाते, संस्थेचे मार्गदर्शक डॉ. डी. एच. थोरात, प्रा.वसंत चव्हाण, दिनकर जोशी, सुरेश मोदी, सी. व्ही.गायकवाड , फार्मसी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश तरके , बी. एड. कॉलेजचे प्राचार्य डॉ, पुजदेकर , मूकबधिर विद्यालयाचे मुख्याध्यापक आनंद टाकळकर, मतिमंद विद्यालयाचे मुख्याध्यापक आप्पासाहेब चव्हाण, अपंग विद्यालयाचे मुख्याध्यापक इंद्रकुमार लोढा, मु.अ. विनायक मुंजे, सौ. अंजली जोशी यांनी अभिनंदन व कौतुक केले आहे.




# राज्यातील ९६ साखर कारखान्यांनी एफआरपी थकवली

## साखर आयुक्त विभागाकडून कारवाई होणार का?

राज्यातील साखर कारखान्यांचा उशिरा हंगाम सुरू होऊन महिनाभर आदीचं संपण्याच्या मार्गावर आहे. दरम्यान, साखर आयुक्त विभागाने राज्यातील गळीत हंगाम, साखर उत्पादन तसेच एफआरपी दिलेल्या साखर कारखान्यांची माहिती प्रसिद्ध केली आहे. यामध्ये जवळपास ९६ साखर कारखान्यांनी एफ

दोन महिन्यांतील हंगामात गाळप आणि साखर उत्पादनात यावर्षीचा हंगाम मागे पडला आहे. त्याचबरोबर कारखान्यांचे गाळप पूर्ण होऊन बंद होण्याचे प्रमाण गतवर्षीच्या तुलनेत वाढले आहे. आतापर्यंत केवळ ९ कारखान्यांचे गाळप पूर्ण झाले होते. यावर्षी २५ कारखाने बंद झाले आहेत. यामध्ये २१ कारखाने केवळ सोलापूर विभागातील आहेत. एकूण ४९६ लाख १९ हजार मेट्रिक टनांइतके ऊस गाळप कारखान्यांनी पूर्ण केले. साखर कारखान्यांनी १५ जानेवारीअखेर गाळप केलेल्या उसाच्या एफआरपीच्या १६ हजार ५७७ कोटींपैकी प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर १३ हजार ९८२ कोटी रुपये जमा करण्यात आले आहेत.



तत्कालीन साखर आयुक्त डॉ. कुणाल खेमनार यांनी साखर विभागाच्या केंद्रीय मुख्य संचालकांना अहवाल पाठवला आहे. या अहवालात मिळालेल्या माहितीनुसार, राज्यातील साखर कारखान्यांनी ८४.३५ टक्क्यांइतकी एफआरपी जमा झाली आहे. २०० साखर कारखान्यांमधील ६६ साखर कारखान्यांनी एफआरपीची १०० टक्के रक्कम शेतकऱ्यांना दिली आहे. तर ३७ कारखान्यांनी ८० ते ९९ टक्के रक्कम दिली आहे. आणखी ३७ कारखान्यानी ६० ते ७९ टक्के एफआरपी दिली आहे. तर ५९ कारखान्यांनी शून्य ते ५९ टक्के एफआरपी दिली आहे.

मागच्या वर्षीच्या तुलनेत यंदा अनेक साखर कारखान्यांची एफआरपी थकीत आहे. यामुळे राज्यातील ऊस उत्पादक शेतकरी आर्थीक संकटात सापडण्याची शक्यता आहे. शेतकऱ्यांना उसाची बिले वेळेवर मिळण्यासाठी साखर आयुक्त कार्यालयाकडून साखर कारखान्यांवर काय कारवाई होणार का? असा सवाल उपस्थित केला जात आहे. सोलापूर विभागात सर्वाधिक ४५ कारखान्यांनी गाळप हंगामास सुरुवात केली होती. त्यापैकी २५ कारखाने फेब्रुवारीमध्येच बंद झाले. ऊस कमी होत असल्याने पुढील वर्षीच्या गाळप हंगामाबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. याच वर्षी कारखाने लवकर बंद होत आहेत. मागील १५ दिवसांत राज्यातील २५ कारखाने बंद झाले आहेत. त्यामध्ये सोलापूरनंतर नांदेड विभागातील चार कारखाने बंद झाले.




### जागतिक दिवस
### सामाजिक न्याय दिवस

### महत्वाच्या घटना

१७९२ : जॉर्ज वॉशिंग्टनने टपाल सेवा कायद्यावर सही केल्यामुळे अमेरिकेत टपाल खात्याची सुरूवात झाली.
१८३५ : आजच्या दिवशी कोलकत्ता मेडिकल कॉलेज मध्ये अधिकारारिक रित्या विद्यार्थ्यांचे प्रवेश सुरु केले.
१८४६ : इंग्रजांनी आजच्या दिवशी लाहोर वर ताबा मिळवला.
१८४७ : घोड्यांच्या शर्यतीची संस्था रॉयल कलकत्ता टर्फ क्लब ची स्थापना करण्यात आली.
१८६८ : बंगाल चे प्रसिद्ध वृतपत्र 'अमृत बाजार पत्रिका' आजच्या दिवशी सुरुवात झाली.
१९३५ : कॅरोलीन मिकल्सेन हि पहिल्यांदा अंटार्क्टिका येथे हि पाउल ठेवणारी पहिली महिला ठरली.
१९४७ : तत्कालीन ब्रिटीश प्रधानमंत्री क्लीमेंट एटली यांनी भारताचे स्वातंत्र्य देण्याची घोषणा केली.
१९७८ : शेवटचा 'ऑर्डर ऑफ व्हिक्टरी' सन्मान लिओनिद ब्रेझनेव्ह यांना देण्यात आला.
१९८७ : मिझोराम भारताचे २३ वे राज्य बनले.
२००९ : संयुक्त राष्ट्र संघाने २० फेब्रुवारी ला सामजिक न्याय दिवस म्हणून साजरे करण्यास सुरुवात केली.
२०१४ : बऱ्याच गदारोळानंतर राज्यसभेतही आंध्र प्रदेशच्या विभाजनाचे विधेयक संमत झाल्याने 'तेलंगण' हे भारताचे २९ वे राज्य बनले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८४४ : लुडविग बोल्टझमन – ऑस्ट्रियन भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ५ सप्टेंबर १९०६)
१९०१ : इजिप्त चे पहिले अध्यक्ष मिसर मुहम्मद नागुईब यांचा जन्म. (मृत्यू: २८ ऑगस्ट १९८४)
१९०४ : अलेक्सी कोसिजीन – रशियाचे पंतप्रधान (मृत्यू: १८ डिसेंबर १९८०)
१९२१ : हरियाणा चे माजी मुख्यमंत्री राव वीरेंद्र सिंह यांचा जन्म.
१९२५ : जपानी सुमो ४४ वे योकोझुना तोचीनिशिकी कियोटाका यांचा जन्म. (मृत्यू: १० जानेवारी १९९०)
१९३२ : प्रसिद्ध नाटककार के.वी.सुबन्ना यांचा जन्म.
१९३६ : माजी भारतीय फुटबॉल खेळाडू जर्नल सिंह यांचा जन्म.
१९५१ : गॉर्डन ब्राऊन – इंग्लंडचे पंतप्रधान
१९५६ : भारतीय चित्रपट अभिनेता अन्नू कपूर यांचा जन्म.
१९७३ : भारतीय चित्रपट अभिनेते प्रियांशु चटर्जी यांचा जन्म.
१९८८ : भारतीय चित्रपट अभिनेत्री जिया खान यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९०५ : विष्णुपंत छत्रे – भारतातील सर्कस उद्योगाचे जनक (जन्म:१८४६)
१९१० : ब्युट्रोस घाली – इजिप्तचे पंतप्रधान (जन्म: १८४६)
१९५० : बॅ. शरदचंद्र बोस – स्वांत्र्यसेनानी, झुंजार पत्रकार, नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे वडील बंधू (जन्म: ६ सप्टेंबर १८८९)
१९७४ : के. नारायण काळे – नाट्यसमीक्षक (जन्म: )
१९९३ : प्रसिद्ध लक्झरी स्पोर्ट्स लॅम्बोर्गिनी कारचे निर्माते फारूशियो लॅम्बोर्गिनी यांचे निधन.
१९९४ : त्र्यं. कृ. टोपे – घटनातज्ञ व मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू.
१९९७ : श्री. ग. माजगावकर – पत्रकार, 'माणूस' साप्ताहिकाचे संपादक इंद्रजित गुप्ता – केन्द्रीय गृहमंत्री आणि कम्युनिस्ट पक्षाचे नेते (जन्म: १८ मार्च १९१९)
२०१२ : डॉ. रत्नाकर मंचरकर – संत साहित्याचे गाढे अभ्यासक, साक्षेपी समीक्षक व संशोधक (जन्म: ६ आक्टोबर १९४३).

# मसूर मिश्र लागवड शेतकऱ्याना ठरेल फायदेशीर



भारत हा एक कृषिप्रधान देश आहे. दिवसेंदिवस भारतातील कृषीक्षेत्र मजबूत होत चालले आहे. सर्व समस्यांना मात देत भारतीय शेतकरी उत्पादनात वाढ करत आहे. त्यामुळे इतर देशांच्या तुलनेत कृषी उत्पादने बाबतीत भारत हा स्वावलंबी बनत चालला आहे. देशातील शेतकरी प्रत्येक हंगामात कडधान्य पिकाची लागवड करत आहे. पण बदलत्या वातावरणामुळे खरीप हंगामात ते बहुदा शक्य होत नाही. परंतु रब्बी हंगामात मात्र शेतकरी कडधान्य पिकातून मोठ्या प्रमाणात उत्पन्न मिळू शकतो. या रब्बी हंगामामध्ये शेतकऱ्याने जर मुख्य कडधान्य पीक मसूराची मिश्र शेती केली तर मसूर शेतकऱ्यांना भरघोस उत्पन्न मिळवून देऊ शकते.

मसूर शेती करताना या गोष्टींची काळजी घ्या : मसूर हे एक मुख्य कडधान्य पीक आहे. त्यामुळे पेरणी करण्यापूर्वी जमिनीची चाचणी करून घेणे हे आवश्यक आहे. मसुराची लागवड फक्त रब्बी हंगामात केली जाते. मसूराच्या शेतीतून अधिक उत्पन्न मिळवण्यासाठी शेतकऱ्यांनी १५ ऑक्टोबर ते १५ नोव्हेंबर या दरम्यान मसूराची पेरणी करावी. हलकी चिकन माती मसुराच्या लागवडीसाठी सर्वात योग्य पर्याय आहे. त्याचबरोबर शेतकरी लाल लॅटराईट जमिनीतही मसूर पेरू शकतात. मसूर पेरणीसाठी मुख्यतः सेंद्रिय पद्धतीचा वापर करावा. इतर पिकांप्रमाणे मसूराच्या उत्पादनात माती आणि हवामान खूप महत्त्वाची बजावतात. त्यामुळे मातीचे मूल्य ५.८-७.५ या दरम्यान असावे. पिकाच्या पेरणी पासून ते झाड वाढणी पर्यंत चांगल्या उत्पादनासाठी हवामान थंड आणि तापमान १८ ते ३० अंश सेल्सियस पर्यंत असावे.

मसूराची बियाणे : मसूर पिकाच्या लागवडीसाठी हेक्टरी ३० ते ३५ किलो बियाणे लागते. चांगल्या उत्पादनासाठी बियाणांवर पेरणीपूर्वी ५ ग्रॅम रायझोबियम कल्चर आणि ५ ग्रॅम स्फुरद जिवाणू कल्चर ची प्रक्रिया करून त्यांना सावलीच्या जागी वाळवून दुसऱ्या दिवशी बियाणे ड्रिल मशीनच्या साह्याने पेरावे. या प्रक्रियेमुळे उत्पादनात वाढ होऊ शकते.

मसूर उत्पादनासाठी लागणारे खत आणि सिंचन : कडधान्य पिकांच्या लागवडीमध्ये माती परीक्षण करून त्यावर आधारित खतांचा वापर करणे अधिक चांगले असते. त्याचबरोबर शेतकरी मसूरच्या चांगल्या उत्पादनासाठी गांडूळ खत, शेणखत, आणि सेंद्रिय खतांचा देखील वापर करू शकता. मसूर या पिकामध्ये दुष्काळ सहन करण्याची क्षमता अधिक असते त्यामुळे हे पीक कमी पाण्यात देखील भरघोस उत्पन्न देऊ शकते. या पिकाला पहिले पाणी पेरणीनंतर ४५ दिवसांनी म्हणजेच खुरपणीच्या वेळी द्यावे लागते. तर दुसरे पाणी शेंगा तयार होण्याच्या वेळी म्हणजेच पीक पेरणीनंतर ७० ते ७५ दिवसांनी द्यावे.

मसूराच्या लागवडीतून मिळणारे उत्पन्न

मसूर पिकाची योग्य मशागत करून योग्य हवामानाखाली पेरणी केल्यास ११० ते १४० दिवसात हेक्टरी २० ते २५ क्विंटल पर्यंत धान्याचे उत्पादन मिळू शकते. त्याचबरोबर मसूर पिकापासून जवळजवळ ३० ते ३५ क्विंटल जनावरांसाठी चारा तयार होऊ शकतो.

# उन्हाळ्यात जनावरांची घ्या विशेष काळजी

या वर्षी उन्हाळी हंगाम लवकर सुरू होत असल्याचे हवामान विभागाचे अंदाज आहे. त्यातच पाणी आणि चारा टंचाई यासारख्या समस्यांमुळे उन्हाळ्यात जनावरांसाठी योग्य नियोजन करणे गरजेचे असणार आहे. वाढत्या उन्हामुळे जनावरे भरपूर पाणी पितात. अंगाची लाही लाही झाल्याने कोरडा चारा खात नाहीत. जनावरांच्या हालचाली मंदावतात. तसेच जनावरे सावलीकडे धाव घेऊन सावलीत स्थिरावतात. जनावरांच्या शरीराचे तापमान वाढते, जोरात श्वास घेणे, भरपूर घाम येणे, अशी लक्षणे दिसू लागतात. दुभत्या जनावरांची उत्पादन क्षमता कमी होते. प्रजनन क्षमता आणि रोगप्रतिकारक शक्तीदेखील कमी होते. यासाठी जनावरांचा आहार आणि पाणी नियोजन, गोठ्याचे व्यवस्थापन, रोग प्रतिबंधक लसीकरण याविषयी योग्य ती काळजी घेणे गरजेचे असणार आहे

उन्हाळ्यातील जनावरांचे व्यवस्थापन :

उन्हाळ्याच्या दिवसांत जनावरांना शक्यतो सकाळी व संध्याकाळी उन्ह कमी असताना चरण्यास सोडावे. हवामानपूरक सुधारित गोठे बांधावेत. गोठ्याची उंची जास्त असावी जेणेकरून गोठ्यात हवा खेळती राहील. छपराला शक्यतो पांढरा चुना अथवा रंग लावावा. तसेच त्यावर पालापाचोळा, तुराट्या, पाचट टाकावे. यामुळे सूर्याची किरणे परावर्तित होऊन गोठा थंड राहील. परिसर थंड राहण्यासाठी गोठ्याच्या सभोवताली झाडे लावावीत. मुक्तसंचार गोठ्याचा अवलंब करावा. गोठ्यामध्ये वातावरण थंड



राहण्यासाठी पाण्याचे फवारे, स्प्रिंकलर्स यासोबत पंख्याचा वापर करावा. जनावरांना दिवसातून किमान एकदा तरी खरारा करावा. त्यामुळे जनावरास थोडे तरतरीत वाटते व अंगावरील गोचीड व मरकट केस गळून पडतात. दुपारच्या वेळेस गोठ्याच्या भोवती बारदाणे, शेडनेट लावावेत व शक्य असल्यास त्यांना पाण्याने भिजवावे, जेणेकरून उष्ण हवा गोठ्यात येणार नाही व आतील वातावरण थंड राहील. जनावरांना मुबलक प्रमाणात थंड पिण्याचे पाणी उपलब्ध करावे. जनावरांना जास्त चावावा लागणारा चारा हा सकाळ किंवा सायंकाळी, म्हणजे ज्यावेळी उन्हाचा तडाखा असेल अशा वेळेस देऊ नये. कारण असा चारा चावण्यासाठी जनावराच्या शरीरात अतिरिक्त उष्णता तयार होते. जनावरांना दिवसभरात लागणारा चारा एकाच वेळी देण्याऐवजी समान विभागणी करून तीन ते चार वेळेस द्यावा. वाळलेल्या गवतावर किंवा कडब्यावर मिठाचे किंवा गुळाचे पाणी शिंपडावे म्हणजे जनावरे आवडीने चारा खातात. चाऱ्याची कमतरता असल्यास खाद्यामध्ये कडुनिंब, अंजन, वड, पिंपळ, शेवरी इत्यादी झाडांची ओली पाने, हरभरा, भुईमुगाची टरफले, गव्हाचा भुस्सा, उसाचे वाढे यांचा योग्य प्रमाणात वापर करावा. माजावर असलेल्या गाई, म्हशींना सकाळी, सायंकाळी कृत्रिम रेतन करावे. दूध देणाऱ्या जनावरास दोन्ही वेळी दूध काढण्यापूर्वी थंड पाण्याने धुतल्यास त्यावरील शारीरिक ताण हा कमी होतो. दूध उत्पादनात वाढ होते. जनावरांना वेळोवेळी जंतनाशक औषधे पाजावी. जनावरांचे नियमितपणे लाळखुरकुत, घटसर्प, फऱ्या, पीपीआर, आंत्रविषार इत्यादी रोगप्रतिबंधक लसीकरण करून घ्यावे.

# कोथिंबीरीपेक्षा धण्यात जास्त नफा, अशी करा लागवड

मसाला बियाण्यांच्या पिकांमध्ये मेथी, सोप, धणे, शेपू, ओवा, जिरे, सोवा, काळेजिरे, अनिसे, कसुरी मेथी ही काही महत्वाची मसाला बियाणे पिके आहेत. भारतात जवळपास १९ मसाला बिया पिके घेतली जातात. परंतु तुलनात्मकदृष्ट्या त्यांचे क्षेत्र कमी असल्याने ही दुय्यम पिकात मोडली जातात. वरील मसाला बियाणे पिकातील धणे हे महत्वाचे पीक असून ॲपिअसी कुटुंबातील आहे. धणे किंवा कोथींबीर या पिकांना भारतात व भारताबाहेर वर्षभर मागणी असते. याच्या पानांचा (कोथंबीर) वापर जेवणात किंवा जेवणाच्या थाळीचे सौंदर्य वाढविण्यासाठी तसेच चवीमध्ये वेगळेपणा आणण्यासाठी केला जातो.

धणे हे पीक उष्णकटीबंधीय प्रदेशात येते. धण्याच्या उत्पादनासाठी पीक फुलावर असताना वातावरण कोरडे व थंड असणे गरजेचे आहे. या पिकाच्या लागवडीकरिता कुठल्याही प्रकारची जमीन चालते. परंतु कोरडवाहु पिक पद्धतीमध्ये हे पिक फक्त भारी जमिनीत घेणे फायद्याचे ठरते. कारण फुलोरावस्थेत पाणी धरून ठेवणारी व उपलब्ध करून देणारी जमिनच या पिकाकरिता निवडणे गरजेचे आहे.

धणे पिकासाठी महत्वाच्या जाती : धणे पिकाच्या अधिक उत्पादनाकरिता राष्ट्रीय मसाला बियाणे संशोधन केंद्र, अजमेर, राजस्थान या केंद्र शासनाच्या अधिनस्त असणाऱ्या संस्थेने आणि भारतातील कृषि विद्यापीठांनी खालील जातीचे प्रसारण केले आहे.

एसीआर - १ : ही राष्ट्रीय मसाला बियाणे संशोधन संस्था, अजमेर येथून २००६ मध्ये प्रसारीत केलेली जात आहे. ही जात कोथींबीरीची पाने व धणे निर्मीतीकरीता वापरता येते. धण्याचे



बी गोलाकार असून मध्यम आकाराचे आहे. या बियामध्ये ०.५ ते ०.६ टक्के तेलाचे प्रमाण आढळून आले. भुरी व काळा दाणा या रोगास प्रतिबंधक आहे.

आरसीआर - ४३६ : कृषी महाविद्यालय, जोबनेर, राजस्थान यांच्याकडून १९९५ मध्ये निवड पद्धतीने विकसित केलेली जात आहे. ही कोरडवाहू पध्दतीने लागवडीस योग्य जात आहे. १००० दाण्याचे वजन १० ते १३ ग्रॅम असून लवकर तयार होणारा (९०-११० दिवस) वाण आहे. हेक्टरी १४ ते १६ क्विंटल उत्पादन देणारा वाण म्हणून प्रसिध्द आहे.

जीसीआर - २ : जागुदान (गुजरात) येथील अखिल भारतीय समन्वयीत मसाला बियाणे संशोधन प्रकल्पातून २००७ मध्ये निवड पध्दतीने ही जात प्रसारित करण्यात आली आहे. कोरडवाहू पिक परिस्थितीत लवकर लागवडीकरिता (ऑक्टोबर-नोव्हेंबर) ही अतिशय महत्वाची जात आहे. साधारणपणे ११०-११५ दिवसात तयार होणारी आणि हेक्टरी १४ ते १६ क्विंटल उत्पन्न देणारी जात आहे.

धणे लागवडीसाठी बिजप्रक्रिया महत्वाची :

धणे लागवडीकरिता लागणारे बियाणे, जमिनीचा प्रकार, बियाण्याचा आकार, लागवडी वेळी जमिनीतील ओलाव्याचे प्रमाण (ओलित किंवा कोरडवाहू क्षेत्र) यावर अवलंबुन असते. ओलितासाठी १०-१२ किलो प्रति हेक्टरी आणि कोरडवाहू क्षेत्रासाठी २० किलो प्रति हेक्टरी याप्रमाणे बियाणे लागते. लागवडीपूर्वी धने बियाण्यास रगडून घेऊन बियाण्याचे दोन भाग होतील ही काळजी घ्यावी. यानंतर थायरम २ ग्रॅम प्रती किलो बियाणे + ४ ग्रॅम ट्रायकोडर्मा प्रति किलो बियाणे चोळून घ्यावे.

धणे लागवडीची पध्दत : सर्वसाधारणपणे धणे उत्पादन करण्यासाठी या पिकाचा कालावधी १२० ते १३० दिवस असल्याने या पिकाची लागवड पेरीव पध्दतीने करावी. त्यासाठी दोन ओळीतील अंतर ६० से. मी. (जमीनीचा मगदूर बघून) ठेवावी. भारी जमिन असल्यास हे अंतर ७५ से.मी. पर्यंत ठेवावे. टोकण पद्धतीने धणे लागवड करता येते, त्यासाठी दोन ओळीतील अंतर ६० सें.मी.; दोन झाडातील अंतर ४५ सें. मी. ठेवावे. लागवड करताना खोली २.५ से.मी. पेक्षा जास्त ठेवू नये.

धणे पिकासाठी पाणी व्यवस्थापन : ओलिताखालील धणे लागवडीसाठी भारी जमिनीत ३ ओलीत आणि हलक्या जमिनीत ५ ते ६ ओलिताची गरज आहे. परंतु फुलोरावस्था, बिजधारणा अवस्थेत पाण्याचा ताण पडणार नाही याची काळजी घ्यावी.

धणे पिकासाठी खत व्यवस्थापन : धणे हे पिक खत व्यवस्थापनास अतिशय चांगला प्रतिसाद देते. लागवडीपूर्वी २० टन चांगले कुंजलेले शेणखत प्रति हेक्टरी द्यावे. सोबतच रासायनिक खतांची ६०:३०:३० क्विंटल नत्र, स्फुरद आणि पालाश प्रति हेक्टरी शिफारस करण्यात आलेली आहे. अर्धा नत्र आणि पूर्ण स्फुरद व पालाश ही खते फुलोरावस्थेत द्यावी. उर्वरित अर्धा नत्र धण्याची दुधाळ अवस्था असताना द्यावा.

# बीडच्या नाट्यगृहाची दुरावस्था

## शरद पोंक्षेनी नगरपरिषद प्रशासनाच्या अब्रुची लक्तरे वेशीवर टांगली







बीड। प्रतिनिधी

बीड शहराचे वैभव असलेल्या शहरातील एकमेव रंगमंच असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाची मोठ्या प्रमाणात दुरावस्था झालेली आहे. दि.१६ रविवारी ''पुरूष'' नाटकांच्या सादरीकरणासाठी आलेल्या कलावंतांना झालेल्या गैरसोयीबद्दल बंद वातानुकूलित यंत्रणा, घाणेरडे स्वच्छतागृह, तुटलेले सोफे याबाबत ज्येष्ठ कलावंत शरद पोंक्षे यांनी असुविधांबाबत जाहीर नाराजी बोलावून दाखवत पुन्हा बीडला या नाट्यगृहात नाट्य प्रयोग सादर करण्यासाठी येणार नसल्याचे जाहीर करत नगरपरीषद प्रशासनाच्या अब्रुची लक्तरे वेशीवर टांगली आहेत. त्यामुळे संबंधित प्रकरणात आवश्यक उपाययोजना करण्यात यावी.

बीड शहरातील इतर कामांवर कोट्यावधीचा खर्च करणाऱ्या नगरपालिका प्रशासनाला नाट्यगृहाची दुरावस्था दिसत नसल्याने कलाकारांचे हे माहेरघर मोडकळीस येते की काय असा प्रश्न निर्माण झाला आहे त्यामुळे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री एकनाथजी शिंदे, सांस्कृतिक मंत्री आशिष शेलार यांना तक्रार केली आहे.

बीड जिल्ह्यातील सर्वात पहिले व सर्वात मोठे असा एकेकाळी नावलौकिक असलेल्या यशवंतराव चव्हाण नाट्यगृहातील खुर्च्यांची मोडतोड व वातानुकूलित यंत्रणेचा बिघाड, स्वच्छतागृहाची मोडतोड झाल्याने कलावंत नाट्यप्रेमींची कुचंबणा होत असल्याचा आरोप करत नाट्यप्रेमींनी बीड शहराच्या सांस्कृतिक वैभवात भर घालणाऱ्या नाट्यगृहाच्या दुरूस्तीकडे प्रशासन जाणीवपूर्वक कानाडोळा करत असल्याचा आरोप करत नाट्यगृह बचाव कृती समिती नाट्यप्रेमींनी पेटी , ढोलकीच्या तालावर गाणे म्हणत दि. १२ डिसेंबर २०२३ रोजी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर लक्षवेधी आंदोलन केले होते.

आंदोलनात नाटककार व कलावंत डॉ.सतिश साळुंखे, डॉ.सुधीर निकम, लक्ष्मीकांत दोडके,प्रतिक कांबळे, कैलास शिंदे,गौतम खटोड, मुकुंद धुताडमल, रविराज जेधे, डॉ.उज्वला वनवे, एजाज अली, विनोद दळवी, डॉ.वारे , सुरेश साळुंके, केशव भागवत,देवा दहे,बाळु निसर्गंध आदींनी सहभाग घेतला होता.



माजलगाव:- येथील कृषी उत्पन्न बाजार समिती कार्यालयांमध्ये छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी करताना कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती श्रीहरी (नाना) मोरे समवेत सचिव हरिभाऊ सवणे,सहा. सचिव रवींद्र नाईकनवरे, लेखापाल उद्धव फपाळ,संख्याकी अधिकारी एम.एस. चव्हाण,निरीक्षक सुनील सवणे,प्रदीप पट्टेकर,अशोक माळी.



पाटोदा : प्राथमिक आरोग्य केंद्र दासखेड. तालुका पाटोदा जिल्हा बीड येते.. आज दिनांक १९ फेब्रुवारी . रोजी. शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. व शिवजयंती निमित्त हॉस्पिटलच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. प्राथमिक आरोग्य केंद्राचे प्रमुख डॉक्टर डॉक्टर .प्रसाद कुटे. डॉक्टर शरयू पडोळे. डॉक्टर सयद कादर. व पत्रकार सतीश गर्जे. गीतांजली सांगळे.व इतर स्टाफ. उपस्थित होता.

## थोडक्यात



### केएसके कृषि महाविद्यालयात शिवजयंती साजरी

बीड :- येथील सौ. के.एस. के. 'काकू' अन्नतंत्र आणि कृषि महाविद्यालय, बीड येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, जाणता राजा छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या प्रसंगी संस्थेचे सहसचिव डॉ. गोविंद साळुंके यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच त्यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जिवन शैली, नियोजन, कटीबध्दता, स्त्री सन्मान इत्यादी, विषयावर मार्गदर्शन केले तसेच विद्यार्थ्यांनी बदलता युवा वर्ग त्याच्यासमोरील आव्हाणे यांची सांगड शिवरायांच्या विचारांशी जोडत विद्यार्थ्यांना आपले विचार मांडले. याप्रसंगी अनेक विद्यार्थ्यांनी छत्रपतीं विषयी आपली मनोगत व्यक्त केली. प्रा.पी.जी.पौळ यांचा मुलगा चि. पृथ्वीराज पौळ याने शिवरायांच्या जीवनावर पोवाडा आणि गीत सादर केले.या वेळी प्राचार्य, सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### पाटांगण गल्लीतील अंगणवाडीत शिवजयंती साजरी

बीड : बीड शहरातील पाटांगण गल्ली येथील अंगणवाडी क्रमांक ६१ मध्ये बुधवारी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने अंगणवाडीतील चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रमाता जिजाऊ यांची वेशभुषा साकारली होती.अंगणवाडीत बुधवारी सेविका शोभा पाटील व मदतनीस रेखा बीडकर यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतीमेचे पुजन करून अभिवादन केले. जयंती कार्यक्रमास अंगणवाडीतील १५ मुले उपस्थीत होती.यावेळी अंगणवाडी सेविका शोभा पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्यावर मुलांना माहिती दिली.



# सरस्वती विद्यामंदिरचे आदर्श माता पुरस्कार जाहीर

बीड। प्रतिनिधी

येथिल शिवाजीनगर भागातील सरस्वती विद्यामंदिर चे प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या तसेच आपल्या पाल्यास सर्वगुणसंपन्न बनवून देशाचा एक आदर्श भावी नागरीक घडविणाऱ्या मातांचा सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड चे संस्थापक सचिव सन्माननीय उत्तमराव पवार साहेब यांच्या मातोश्री स्व.नानीबाई पवार यांच्या स्मरणार्थ दिले जाणारे सन -२०२५ चे माझी आई नानीबाई आदर्श माता पुरस्कार जाहीर झाले असून सदरील पुरस्कारांचे वितरण दिनांक २२/२/२०२५ शनिवार रोजी सकाळी ठीक १०:०० वा.सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड प्रशालेत मान्यवरांच्या हस्ते संपन्न होणार आहेत.

सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड या प्रशालेचे सन-२०२५ चे माझी आई नानीबाई आदर्श माता पुरस्कार या वर्षी सौ.कांता संतोष सोनवणे( पी.एस.आय.) चिडीमार पथक बीड ( विशेष पुरस्कार) , सौ.वैष्णवी निलेश मोहिते .स्नेहसावली अनाथ आश्रम रामनगर बीड ( विशेष पुरस्कार) , सौ.गंगाताई अर्जुनराव शिंदे ( अलंकार ड्रेसेस बीड, डॉक्टर जयश्री जनार्दन मुंडे, सौ.अनिता रविंद्र निर्मळ,सौ.सारिका सत्यप्रेम पैठणे, सौ.रेखा विश्वास घोसाळकर, सौ.मिना मिठ्ठू गुरव व सौ.मंगल पांडुरंग खराडे या आदर्श मातांना जाहीर झाले असून पुरस्कार जाहीर झालेल्या सर्व आदर्श मातांचे संस्थेचे संस्थापक सचिव मा.श्री.उत्तमराव पवार साहेब, संचालक मा.श्री.बाबुलाल पवार साहेब तसेच संस्थेच्या सर्व संचालक मंडळासह सरस्वती विद्यामंदिर शिवाजीनगर बीड चे सर्व शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी पालक व विद्यार्थ्यांनी त्यांचे हार्दिक अभिनंदन केले आहे. आदर्श माता पुरस्काराचे हे ९ वे वर्ष असुन ९ व्या वर्षाचे औचित्य साधत ९ आदर्श मातांना हे पुरस्कार जाहीर करण्यात आले आहेत असे कार्यक्रमाचे आयोजकांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकाद्वारे जाहीर केले आहे.

# छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याबरोबर सुराज्याची स्थापना केली - राजेभाऊ फड

परळी। प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक, कुळवाडी भूषण छत्रपती शिवाजी महाराज यांनी स्वराज्याबरोबर सुराज्याची स्थापना केली. अठरापगड जाती - धर्माच्या प्रजेच्या हिताच्या रक्षणाची त्यांनी विशेष काळजी घेतली. आपल्या राज्यातील जनतेच्या मिरचीच्या देठालाही धक्का लागला नाही पाहिजे असा राजेंचा कटाक्ष होता. म्हणूनच त्यांना सबंध विश्वाचे ''जाणते राजे'' अशी पदवी बहाल केली. हेच सुशासन अबाधित राखणे, तोच सलोखा कायम ठेवणे या राज्याचे नागरिक म्हणून आपल्या प्रत्येकाची जबाबदारी असल्याचे प्रतिपादन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केले. पक्षाच्या वतीने शिवजयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील संपर्क कार्यालयात शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले तसेच महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्याला अभिवादन करण्यात आले.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांच्या नेतृत्वाखाली



परळी वैजनाथ शहरात शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. मुख्य चौकातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथील महाराजांच्या अश्वारूढ पुतळ्यास अभिवादन करण्यात आले. तसेच पक्षाच्या परळी विधानसभा जनसंपर्क कार्यालयात शिवप्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी पक्षाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब शिंदे पाटील, ज्येष्ठ नेते उत्तमदादा माने, शहराध्यक्ष ॲड.जीवनराव देशमुख, मुक्ताराम गवळी, महिला आघाडीच्या जिल्हा सरचिटणीस मंगलताई सोळंके, तालुकाध्यक्ष वर्षाताई रायभोळे, शहराध्यक्ष कल्पनाताई देशमुख, शिवाजीराव लोमटे, भगवानराजे कदम, प्रकाश मुंडे, युवा कार्यकर्ते अक्षय सोनवणे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी बोलत असताना राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी शिवचरित्रावर प्रकाश टाकला. ते बोलत असताना म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज यांचा इतिहास हा पुढील शेकडो पिढ्यांसाठी प्रेरणादायी आणि आदर्श असा आहे. महाराजांनी उभे केलेले स्वराज्य आणि सुराज्य आजच्या काळात अबाधित राखण्यासाठी सर्वाभिमुख प्रयत्न होणे गरजेचे असल्याचेही प्रतिपादन त्यांनी केले.

# महाशिवरात्रीनिमित्त कुर्ला येथे आजपासून अखंड हरिनाम सप्ताह

बीड। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील कुर्ला येथील महादेव मळी संगमेश्वर संस्थानावर महाशीवरात्री निमित्त आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात होत आहे.सकाळी ९ वाजता कुर्ला येथील हनुमान मंदिरावर मिरवणूकीनंतर फुले टाकली जाणार आहे. येत्या बुधवार २६ फेब्रुवारी रोजी वाराणसी येथील पद्मश्री गणेश्वरशास्त्री द्राविड गुरुजी हे उपस्थीत राहणार आहेत.

कुर्ला येथील संगमेश्वर संस्थान महादेव मळी येथे भगवान बाबा टाकळगांवकर यांच्या अधिपत्याखाली व बबन महाराज मस्के यांच्या हस्ते आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन अखंड हरिनाम सप्ताहास सुरूवात होत आहे.येत्या गुरूवार २७ फेब्रुवारी पर्यंत हा सप्ताह चालणार आहे. आज गुरूवार २० फेब्रुवारी २०२५ पासुन रात्री ८.३० ते १०.३० या वेळेत शामराव महाराज नेरकर, शुक्रवार २१ फेब्रुवारी रोजी आळंदी येथील कीर्तनकार पांडुरंग महाराज क्षीरसागर, शनिवार २२ रोजी ज्ञानेश्वर महाराज कदम, रविवार २३ रोजी सत्यवान महाराज लाटे, सोमवार २४ रोजी मारुती महाराज तुनतुने, मंगळवार २५ रोजी सच्चिदानंद महाराज कांबेकर, बुधवार २६ रोजी आळंदी येथील यशोधन महाराज साखरे यांची कीर्तने होणार आहेत. येत्या गुरूवार २७ रोजी पुरुषोत्तम उर्फ बबन महाराज मस्के यांचे दुपारी १२ ते २ काल्याचे कीर्तन होणार आहे. कुर्ला पंचक्रोशीतील भाविकांनी महाप्रसाद लाभ घ्यावा असे आवाहन संतोष मोरे यांनी केले आहे.

### विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन

संगमेश्वर संस्थान महादेव मळी कुर्ला येथे अखंड हरिनाम सप्ताहात काकडा, भजण, शिवलीलामृत पारायण,गाथा भजण, भावार्थ रामायण,हरिपाठ,हरिकिर्तण ,जागर अशा विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असुन या सप्ताह मध्ये परिसरातील भजनी मंडळी येत्या गुरूवार २७ फेब्रुवारी पर्यंत उपस्थिती राहणार आहेत.

# रमजान महिन्यात पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा, स्वच्छता व्यवस्थित ठेवा-अरफात खान

बीड। प्रतिनिधी

लवकरच येऊ घातलेल्या पवित्र रमजान महिन्यात पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा सुरळीत ठेवण्यासह शहर स्वच्छता व्यवस्थित ठेवावी अन्यथा मौलाना आझाद युवा मंच लोकशाही मार्गाने कडक व तीव्र आंदोलन करेल. असा इशारा मंचचे मराठवाडा अध्यक्ष अरफात खान यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिला आहे.

याविषयी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे की, गेल्या काही महिन्यांपासून बीड शहरातील पाणीपुरवठा, विद्युत पुरवठा आणि स्वच्छता या प्रत्येक नागरिकाला जीवन जगताना अत्यावश्यक असलेल्या बाबींकडे बीड नगर परिषदेसह जिल्हा प्रशासनाचे म्हणावे तसे लक्ष नाही. यामुळे शहरात कुठे आठ दिवसाआड तर कुठे १५ ते २५ दिवसाआड नळांना पाणी सोडले जाते. विद्युत पुरवठा कमी जास्त प्रमाणात वारंवार खंडित होतो. शहर स्वच्छतेची तर पूर्णतः वाताहात झाली आहे. संपूर्ण बीड शहरात गल्लीबोळांपासून ते मुख्य रस्त्यांवर सुद्धा जागोजागी कचऱ्याचे ढिगारे दिसून येतात ते बीड नगर परिषदेकडून नियमितपणे उचलले जात नाही. शिवाय नाल्या दोन-दोन, चार-चार महिने काढल्या जात नाहीत. काढल्या तर काढलेली घाण वेळेवर उचलली जात नाही म्हणून ती घाण पुन्हा नाल्यांमध्ये जाते. असे सर्व भयानक प्रकार गेल्या काही महिन्यांपासून बीड शहरात हमखासपणे दिसून येत आहेत. अशा अवस्थेमध्ये आता लवकरच इस्लाम धर्माचा पवित्र व महत्त्वपूर्ण असा रमजानचा महिना सुरू होणार आहे. यात मुस्लिम बांधव मोठ्या संख्येने रमजानचे रोजे धरतात म्हणून रोजेदारांना पाणी पुरवठा, विद्युत पुरवठा आणि स्वच्छता वेळच्या वेळी खंड न पडता मिळायलाच हवी. जर या सेवांमध्ये कुचराई करण्यात आली तर बीड नगर परिषदेसह महावितरण कंपनी विरोधात लोकशाही मार्गाने मौलाना आझाद युवा मंच तीव्र आंदोलन छेडेल असा खणखणीत इशारा मंचचे मराठवाडा अध्यक्ष अरफात खान यांनी प्रसिद्धी पत्रकातून दिला आहे.

# वंचित घटकांना योग्य प्रमाणात प्रतिनिधित्वाची संधी म्हणजे आरक्षण - संजय मस्के

बीड। प्रतिनिधी

प्रज्ञासूर्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी वंचित व बहुजन समाजाकरिता, देशहिता करिता घेतलेले अपार कष्ट व माता रमाईचा त्याग न विसरता आपण लोकसेवक आहोत याचे भान नवनियुक्त कर्मचाऱ्यांनी सदैव ठेवावे व जिद्द चिकाटी व सर्व महामानवांच्या आदर्श विचारा नुसार वर्तन यशाकडे घेऊन जाते असे उद्गार अध्यक्षपदी लाभलेले जिल्हा ग्रंथालय अधिकारी संजय मस्के यांनी काढले.महामानव अभिवादन ग्रुप व महामानव सार्वजनिक वाचनालय यांच्या संयुक्तविद्यमानेमाने धानोरा रोड बीड येथे एम.पी.एस.सी. तर्फे निवड झालेल्या व वैद्यकीय अधिकारी सेवेत रुजू झालेल्या अशा ९ जणांचा सत्कार समारंभ आयोजित प्रसंगी पि.व्ही बनसोडे, शहाजी पारवे, सुरेश साबळे, उत्तमराव पवार, दयानंद सरपते विचार मंचाचावर उपस्थित होते.

प्रमुख उपस्थितीमध्ये महामानव अभिवादन ग्रुपचे डी.जी.वानखेडे, प्रशांत वासनीक,यु.एस.वाघमारे ॲड.तेजस वडमारे, दशरथ मकासरे, बि.डी. तांगडे, अर्जुन जंजाळ,सुजाता वासनिक हे उपस्थित होते.



कार्यक्रमाचे प्रस्ताविक जी.एम. भोले यांनी करून महामानव अभिवादन ग्रुपच्या मार्फत राबविण्यात येत असलेल्या विविध समाज उपयोगी उपक्रमाबद्दल माहिती दिली. बहारदार सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले. सर्वप्रथम तथागत गौतम बुद्ध व सर्व आदर्श महापुरुषांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्प, पुष्पमाला वाहून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर महसूल सहायक पदी निवड झालेल्या मयुरी तुरुकमारे, सोनिया ससाने, प्राजक्ता तांगडे, प्रमिमा साळवे, राधा डोळस, रेणुका दळवी (आरोग्य सेविका) शैलेश जोगदंड, गौरव साळवे, डॉ. विशाल तांगडे यांचा त्यागमूर्ती माता रमाई यांचे जीवन चरित्र पुस्तक व पेन पुष्पगुच्छ शाल देऊन मान्यवरांच्या हस्ते हृदयी सत्कार करण्यात आला. सत्काराला उत्तर देताना आपल्या मनोगतात राधा डोळस म्हणाली की अत्यंत गरीब परिस्थिती असताना आई-वडिलांनी उच्च शिक्षणाकरिता बाहेरगावी पाठवले. त्यांचे कष्ट सतत डोळ्यासमोर ठेवून व माता रमाईचा बाबासाहेबांच्या व समाजाकरिता त्याग आठवून आपले ध्येय प्राप्त करण्याकरता कितीही त्रास झाला तरी अपयश हे यशाची पहिली पायरी आहे हे थोरा चे मनात उद्गार बिंबवून एम.पी.एस.सी.मार्फत सेवेत रुजू होत आहे हे सांगताना तिचा कंठ दाटून आला. तर शैलेश जोगदंड यांनी आपल्या प्रभावी मनोगतात स्पष्ट केले की सर्वच निवड झालेल्यांची परिस्थिती अत्यंत हलाखीची आहे. परंतु शिक्षण हे असे एक शस्त्र आहे, ते जीवनातील सर्वच कठीण प्रश्न सोडवण्यास जीवनभर मदत करते. प्रमुख पाहुणे दयानंद सरपते म्हणाले की प्रशासकीय सेवेत स्वाभिमानाने लोकसेवा करून दिलेल्या विभागातील कामांची इतंबूत माहिती घेऊन कोणाच्याही दबावाखाली न येता चुकीचे काम करू नये असे अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितले.

सेवानिवृत्त पी.आय. शहाजी पारवे यांनी देखील सरकारी सेवा करत असताना अनेक अडचणी येतात परंतु नियमांचे पालन करून वंचित, अन्यायग्रस्तांना मदत करून आपण समाजाचे काही देणे लागतो हा बहूमोल विचार सतत समोर ठेवून महसूल सहाय्यक या पदाच्याही पुढील पदे स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून मिळवण्यासाठी आटोकाट प्रयत्न करावा. प्रमुख पाहुणे सेवानिवृत्त सिओ बनसोडे पीव्ही यांनी स्पष्ट केले की संविधानाला अपेक्षित असलेले, हया आजच्या ९ सत्कारमूर्ती पैकी ६ मुली आहेत याचा अर्थ स्त्रियांना रूढी परंपरेने नाकारलेल्या प्रगतीची द्वारे खुली करणाऱ्या सावित्रीच्या ह्या लेखी कोणत्याही क्षेत्रात यश प्राप्त करू शकतात हा डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा स्त्री पुरुष लिंगभेद न करता त्यांना समान संधी देण्याच्या संविधानातील तरतुद किती . दूरदृष्टीची व बहुमोलाची आहे हे दिसून येते. कार्यक्रमास परिसरातील बहुसंख्य महिला व पुरुष सत्कार मूर्तीचे पालक व महामानव अभिवादन ग्रुपचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा अशोक गायकवाड यांनी केले.

# विजय कन्स्ट्रक्शनचा वडवणी तालुक्यात निकृष्ट कामांचा धडाका

## अनेक ठिकाणी कामे निकृष्ट दर्जाची, थातुरमातुर कामे करण्याचा सपाटा सुरु; शासनाचे करोडो रुपये खर्चूनही रस्त्यांची स्थिती जैसे-थी च राहाणार, सबंधित अभियंता, अधिकारी आणी कन्स्ट्रक्शनची मिलीभगत

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी तालुक्यातील बर्याच ठिकाणी गेल्या वर्षभरापासून विजय कन्स्ट्रक्शनचे रस्त्यांचे कामे चालु असुन हि कामे करोडो रुपये खर्चूनही दर्जेदार न होता एकदम निकृष्ट दर्जाचे होत असतांनाचे दिसून येत आहेत. या निकृष्ट कामांबाबत कोणी कितीही ओरडले , कितीही तक्रारी झाल्या तरिही या कन्स्ट्रक्शनच्या कामात कसलिही गुणवत्ता किंवा सुधारणा होतांना दिसुन येत नसुन संबंधित अभियंता , आधिकारि आणखी हे कन्स्ट्रक्शन या सर्वांच्या मिलीभगत मधुन सध्या स्थितीला विजय कन्स्ट्रक्शनचा वडवणी तालुक्यात निकृष्ट कामांचा सपाटाच चालु असुन रस्त्यांच्या निकृष्ट कामामुळे शासनाच्या करोडो रुपयांचा अपहार करण्याचा सपाटा चालु असुन शासनाने रस्त्यांसाठी करोडो रुपये खर्चूनही रस्त्यांची दैना मात्र जैसी -थी राहणार असल्याचे दिसुन येत आहे .

गेल्या वर्षभरापासून विजय कन्स्ट्रक्शन अंबेजोगाई कडुन वडवणी तालुक्यातील वडवणी ते चिंचाळा या ४५३.०८लक्ष रुपयांचे ७.५० कि.मी. चे काम चालु असुन ते दर्जेदार न होता निकृष्ट दर्जाचे झाले आसल्याने आत्तापर्यंत कित्येकवेळा त्याठिकाणी खराब झाले काम वारंवार पण थातुरमातुरच करण्यात येत आहे कामाला गुणवत्ताच नसल्याने तो वारंवार खराब होता आसल्याचे दिसुन येत आहे तर त्याकामावरिल अभियंता श्री आर.आर. मते यानिंही स्वतः बोलतांना हे खराबच झाले असल्याची कबुलीही दिली आहे . त्याच बरोबर तालुक्यातील चिंचोली , परडीमाटेगाव या रस्त्यांची कामे देखील विजय कन्स्ट्रक्शनकडेच असुन ते सुद्धा थातुरमातुर करण्याचा सपाटा सर्वांच्या संगणमताने चालु आहे.

परडी माटेगव ते चिंचाळा हे पाच किमी रस्त्याचे दोन ते अडीच कोटी रुपयांचे काम असुन तेथील कामासाठी विजय कन्स्ट्रक्शन कडुन माती मिश्रीत खडी व खडिचे टोळ आणण्यात आलेले आहेत .

परडीमाटेगाव रस्त्यावरील कामासाठी आणलेली खडी ही माती मिश्रीत आहेच शिवाय काही खडी ही प्रमाणात नसुन मोठमोठी आहे ती फोडण्यासाठी व माती मिश्रीत खडी ऐवजी चांगली खडी आणण्यासाठी मी संबंधित गुत्तेदाराला बोलणार आहे - श्री. सि. पी .बोराडे , कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग बीड .







सध्या चिंचाळा ते वडवणी रस्त्यावर डांबर स्प्रे व सिलीकोट चालु असुन यासाठी ६एम एम कच ऐवजीअल्प प्रमाणात डांबर आणखी त्यावर बुकट्याचा स्प्रे करणे चालु आहे यामध्ये बुटका पावडर असल्यामुळे डांबर बुकट्याला पकडलेला आसा प्रश्न जनतेतुन ऐकावयास मिळत असुन हे किती दिवस टिकेल ? हा प्रश्न जनतेतुन विचारल्या जात आहे.

चिंचाळा - वडवणी रस्त्यांचे काम खराब झालेले आहेच त्यासाठी वारंवार काम पुर्ण घेण्यात येईल तोपर्यंत संबधीत कन्स्ट्रक्शनचे पुर्देण यक दिले जाणार नाही - श्री आर.आर. मते अभियंता , प.ग्रा.सडक योजना .

( सिलीकोट स्प्रे साठी वारत असलेला बुटका )

वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथे पंतप्रधान ग्राम सडक योजने अंतर्गत दोन किमी चे किमी करण्यात येणार असुन विजय कन्स्ट्रक्शन व अभियंता श्री आर.आर. मते यांनी संगणमताने हे काम अचानक रात्रीच्या वेळी त्या रस्त्यावर इल पहीली खडी न काढुन घेता, साफसफाई न करताच घाईगडबडीत रात्रीच्यावेळी लाईट लाऊन करण्यात आले आहे घाईगडबडीत केलेले हे निकृष्ट काम किती दिवस टिकेल हा प्रश्न जनतेतुन विचारल्या जात आहे.

''''आशी रात्रीचे कामे करायची नसतात याबाबत संबंधीतांना विचारुन घेतो - सी.बी. शेख , उप अभियंता पी. ग्रा. सडक योजना बीड


# शालेय साहित्य वाटप करून छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सुकळी येथील रिपाईचे नेते तथा सामाजिक कार्यकर्ते कैलास जावळे यांनी अखंड हिंदुस्थानाचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त माळेगाव हायस्कुल मधील विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करून माता छत्रपती शिवाजी महाराजांना अभिवादन केले.

गेल्या काही वर्षापासुन सुकळी येथील रिपाईचे नेते तथा सामाजिक ◀◀ पान ३ वर





शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती आज रोजी मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी पुष्पहार अर्पण करून शिवाजी महाराजांना अभिवादन केले यावेळी पोलीस अधीक्षक अजय बंसल जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर

# या भूमंडलावर स्वत:च्या पराक्रमावर स्वराज्य निर्माण करणारा एकमेव राजा शिवछत्रपती-बनसोडे

माजलगाव । प्रतिनिधी

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती येथील श्री सिद्धेश्वर माध्यमिक विद्यालयात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

या कार्यक्रमाची सुरुवात सांघिक पद्य व छत्रपती शिवाजी महाराज व पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमा पूजनाने झाली.या कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळेचे मुख्याध्यापक संतोष लिंबकर सर, प्रमुख अतिथी प्रभाकर बनसोडे तर व्यासपीठावर पर्यवेक्षक रवींद्र खोडवे, सदाशिव ढगे, कमलाकर झोडगे, परमेश्वर आदमाने इत्यादी उपस्थित होते.



यावेळी प्रमुख पाहुणे प्रभाकर बनसोडे यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रशासन, युद्धनीती तसेच जीवनादर्श आपल्या भाषणातून मांडला.ते फक्त १६ वर्षांचे असताना छत्रपती शिवाजी महाराजांनी हिंदू धर्मातील वेद, पुराणे आणि मंदिरे यांचे रक्षण केले आणि वयाच्या १६ व्या वर्षी महाराजांनी ◀◀ पान ३ वर

# संजय गांधी विभागातील बोगस लाभार्थ्यांची चौकशी करून तहसीलदारासह संबंधितावर फौजदारी गुन्हे दाखल करा -ॲड.गोले


माजलगाव । प्रतिनिधी

येथील तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागात संजय गांधी,श्रावण बाळ व इंदिरा गांधी योजने अंतर्गत लाभार्थ्यांना मिळणाऱ्या मानधनाच्या यादीत तहसीलदार व तहसील कार्यालयातील संजय गांधी विभागातील काही अधिकारी यांनी आप-आपसात संगणमत करून प्रती लाभार्थी यांच्याकडून दहा हजार रुपये प्रमाणे पैसे घेऊन शेकडो बोगस लाभार्थ्यांचा सदरील योजनेत समावेश केला असून याबाबत शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तहसीलदार यांना निवेदन देण्यासाठी दिनांक १८ फेब्रुवारी मंगळवार रोजी शिष्टमंडळाने भेट घेऊन संजय गांधी भागातील बेकायदेशीर लाभार्थ्यांची चौकशी करून संबंधितावर गुन्हे दाखल करण्याची विनंती केली असता तहसीलदार संतोष रुईकर यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या शिष्टमंडळास उडवाउडीची उत्तरे देऊन बेकायदेशीर लाभार्थ्यांची अप्रत्यक्ष पाठराखण केली ही बाब शेतकरी कामगार पक्षांच्या शिष्टमंडळास प्राकर्षाने खटकल्याने त्यांनी तात्काळ आवक जावक विभागामार्फत सदरील निवेदन देऊन संजय गांधी योजनेत बोगस लाभार्थ्यांचा समावेश करणाऱ्या तहसीलदारासह संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने तहसील कार्यालयात दिलेल्या निवेदनाद्वारे ◀◀ पान ३ वर



# आजपासून श्रीक्षेत्र अश्वत्थलिंग महाशिवरात्री महोत्सवास प्रारंभ

## सप्ताह सोहळ्याचा लाभ घ्यावा- महंत महादेवानंद भारती महाराज



पिंपळवंडी । प्रतिनिधी

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री. क्षेत्र अश्वत्थलिंग महादेव मंदिर देवस्थान या ठिकाणी दि.२० फेब्रुवारी २०२५ ते २७ फेब्रुवारी २०२५ दरम्यान महाशिवरात्री महोत्सव संपन्न होत आहे.त्या प्रित्यर्थ रामचरित मानस कथा सप्ताह व श्री संत तुकाराम महाराज गाथा पारायण सोहळा व अखंड वीणा वादन सप्ताहाचे आयोजन केले असून या महाशिवरात्री महोत्सवाचा पंचक्रोशीतील भाविक-भक्तांनी मोठ्या संख्येने येऊन लाभ घ्यावा असे आवाहन राम चरित मानस कथा प्रवक्ते तथा श्री.क्षेत्र अश्वत्थलिंग देवस्थान मठाधिपती श्री.ह.भ.प. गुरुवर्य महंत श्री १००८ स्वामी महादेवानंद भारती महाराज तसेच ह. भ.प.परमानंद भारती महाराज यांनी केले आहे.



यानिमित्त देवस्थान ठिकाणी दररोज नियमित पहाटे ४ ते ६ काकड आरती, ६ ते ७ श्रीस अभिषेक,७ ते ८ विष्णु सहस्रनाम स्तोत्र,हनुमान चालीसा, ◀◀ पान ३ वर

# दादाराव कराड विद्यालयात शिवजयंतीनिमित्त सांस्कृतिक कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी

माईर एम.आय.टी. संचलित कै.दादाराव कराड विद्यालयात शिवजयंती निमित्ताने सांस्कृतिक कार्यक्रम संपन्न झाला. विद्यार्थ्यांनी शिवरायांच्या पराक्रमाचे गौरवगान करणाऱ्या कविता,पोवाडे, कथा, नाटके व नृत्य सादर करून उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.

यावेळी एच.व्ही.साने यांनी विद्यार्थ्यांना शिवरायांच्या ◀◀ पान ३ वर



# फुलसांगवी ग्रामपंचायतच्यावतीने शिवजयंती उत्सव मोठ्या थाटात साजरा

शिरूर । प्रतिनिधी

फुलसांगवी -मार्कडवाडी ग्रामपंचायत च्यावतीने छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली आहे. शिवप्रतिमेची गावभर मिरवणूक करत सरपंच भास्कर सानप यांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून गावकऱ्यांच्या वतीने महाराजांना अभिवादन देण्यात आले आहे.



पोलिसांगवी मार्कडवाडी या ग्रुप ग्रामपंचायत अंतर्गत प्रति वर्षाप्रमाणे याहीवर्षी शिवजयंतीचे मोठ्या ◀◀ पान ३ वर



**गेवराई: तालुक्यातील पाडळसिंगी येथील कृषी पंडित भागुजीराव ढेकळे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ वी जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली याप्रसंगी प्राचार्य थिटे ए.एस, पर्यवेक्षक राजेंद्र रांजवण, सोनवणे आर. आर यांच्यासह सर्व कर्मचारी उपस्थित होते.**



**नवगण राजुरी: येथील गजानन माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक राजमान्य राजर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी प्राचार्य केशव भांगे, उपमुख्याध्यापक शिंदे एस.एस,पर्यवेक्षक दगडे व्ही. एन,शेख एस वाय, भोसले बी. एस .यांच्यासह कर्मचारी उपस्थित होते.**

# मधुकर महाराज खाडे यांचे वारकरी संप्रदायातील योगदान अविस्मरणीय

## ह.भ.प.डॉ.प्रल्हाद महाराज ढाकणे यांचे प्रतिपादन; होळ येथे किर्तन

केज । प्रतिनिधी

मधुकर महाराज खाडे हे भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे आधारस्तंभ होते. त्यांचे वारकरी संप्रदायातील योगदान अविस्मरणीय आहे, असे प्रतिपादन होळ येथील संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांनी व्यक्त केले.

वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. केज तालुक्यातील होळ येथील श्री संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांच्या मार्गदर्शनाखाली गंगापुजनानिमित्त भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह होत आहे. ह.भ.प.डॉ. प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री हे मंगळवारी (दि.१८) किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते.




डॉ.प्रल्हाद महाराज ढाकणे शास्त्री यांनी संत तुकाराम महाराज यांचा अनुसरे तो अमर झाला । अंतरला संसारा ।।१।। न देखती गर्भवास । कधीं दास विष्णूचे ।।ध्रु.।। विसंभेना माता बाळा । तैसा लळा पाळावा ।।२।। त्रिभुवनीं ज्याची सत्ता । तो रक्षीता जालिया ।।३।। हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता.

ढाकणे महाराज म्हणाले, भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे आधारस्तंभ मधुकर महाराज खाडे यांच्या निधनाने पंचक्रोशीची हानी झाली आहे. त्यांनी वारकरी संप्रदायावर नितांत प्रेम केले. संत जोग महाराज पैलवान होते. त्यांनी वारकरी शिक्षण संस्था स्थापन केली. अगदी त्यांचा आदर्श समोर ठेऊन मधुकर खाडे महाराज यांनी होळ येथे वारकरी शिक्षण संस्था सुरू केली. त्यांच्यामुळे किर्तनकार, वारकरी मंडळी होळ ◀◀ पान ३ वर



**बीड: तालुक्यातील पिंपळवाडी विद्यालयात हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांची ३९५ जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी पिंपळवाडी चे सरपंच, उपसरपंच, गावातील प्रतिष्ठित नागरिक, शाळेचे मुख्याध्यापक प्रदीप जगताप, सर्व कर्मचारी उपस्थित होते.**

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात शिवजयंतीचा शाही उत्सव! भगवे झेंडा अन् शिवगर्जनेने अवघे शहर दुमदुमले; सरदारांच्या वंशजांकडून मानवंदना

**पुणे । प्रतिनिधी**

फुलांची आकर्षक सजावट असलेला जिजाऊ मॉंसाहेब शहाजी महाराज शिवज्योत मुख्य स्वराज्यरथ एकापाठोपाठ येणारे सरदारांचे, मावळ्यांचे, वीर मातांचे स्फुर्ती देणारे ९६ स्वराज्यरथ महाराणी ताराराणी शौर्य पथकातील ५१ रणरागिणींच्या मर्दानी खेळांची चित्तथरारक मानवंदना ५१ रणशिंगांची ललकारी नादब्रह्म ट्रस्ट ढोलताशा पथकाचा रणगजर सनई-चौघडयांचे मंगलमय सूर हजारोंच्या संख्येने पारंपरिक पोशाखात उपस्थित महिला आणि शिवभक्तांनी केलेला जय शिवाजी जय भवानीचा जयघोष अशा पवित्र वातावरणात शिवकाळ पुन:श्च एकदा पुण्यामध्ये अवतरला.शिवजयंती महोत्सव समिती पुणे तर्फे शिवजयंती निमित्ताने खास आयोजन करण्यात आले. यावेळी सलग १४ व्या वर्षी हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली.

पुण्यातील शिवजयंती महोत्सव समिती तर्फे शिवजन्मोत्सव स्वराज्यरथ सोहळा आयोजित करण्यात आला होता. शिवाजी महाराजांचे बालपण गेलेल्या लालमहाल येथून भव्यदिव्य मिरवणूक काढण्यात आली. सोहळ्याचे उद्घाटन शिवरायांचे वंशज श्रीमंत खासदार छत्रपती उदयनराजे भोसले महाराज, सहकार आणि नागरी विमान वाहतूक केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, श्रीमंत संजीवराजे नाईक निंबाळकर, समितीचे संस्थापक अध्यक्ष अमित गायकवाड, पोलीस उपायुक्त विशेष शाखा मिलींद मोहिते, आमदार भीमराव तापकीर, चेतन तुपे, सिध्दार्थ शिरोळे, आमदार हेमंत रासने तसेच सर्व स्वराज्यघराण्यांचे प्रतिनिधी यांच्या शुभहस्ते झाले. यावेळी सर्व स्वराज्यघराण्यांचे प्रतिनिधींच्या हस्ते लालमहालातील जिजाऊंच्या पुतळयाला पुष्पहार घालून जिजाऊ मॉंसाहेब शहाजी महाराज शिवज्योत रथावरील शिवज्योत प्रज्वलन करीत मिरवणुकीला सुरुवात झाली.



पुण्यातील भव्य शोभायात्रेवेळी छत्रपती उदयनराजे भोसले म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष आहेत. शिवाजी महाराजांचा एकीचा विचार आजही पाहायला मिळत आहे. पुण्यात शिवजयंती उत्सव मोठ्या प्रमाणात साजरा होत असून सर्व जाती धर्माचे लोक एकत्र येत आहेत. यानिमित्ताने शिवरायांसोबत असलेले सरदार, मावळे यांचे स्मरण होत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी खासदार मुरलीधर मोहोळ म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक होता, त्यावेळी प्रत्येक पायरीवर त्यांना स्वराज्यातील सरदार व मावळ्यांची आठवण झाली. स्वराज्य स्थापनेमध्ये शिवरायांसोबत असलेले सरदार व मावळे यांचे स्मरण या सोहळ्याच्या निमित्ताने केले जात आहे.

भारताच्या इतिहासातील शिवकालीन युध्दकला सादर करणाऱ्या ५१ रणरागिनींच्या औरंगासुर मर्दिनी भद्रकाली रणरागिनी महाराणी ताराराणी शौर्य पथक मर्दानी युध्दकला सादर केली. नादब्रह्म ढोल ताशा पथकाच्या जल्लोषपूर्ण वादनाने वातावरण मंत्रमुग्ध झाले. ईशान अमित गायकवाड यांनी सलग १४ व्या वर्षी शिवजयंती १९ फेब्रुवारीला शिवाजीनगर येथील एसएसपीएमएस संस्थेच्या प्रांगणातील शिवरायांच्या विश्वातील पहिल्या भव्य अश्वारुढ स्मारकावर हैलीकॉप्टर मधून पुष्पवृष्टी केली. या हेलीकॅप्टर पुष्पवृष्टीचे संकल्पक अमित गायकवाड म्हणाले, आपण पुणेकर भाग्यवान आहोत. करवीर संस्थानाचे राजर्षी शाहू छत्रपती आणि त्यांचे पुत्र राजाराम छत्रपती यांनी शिवरायांचे हे स्मारक पुणे येथे निर्माण केले. शिवरायांचा एकसंध ओतीव काम केलेला हा विश्वातील एकमेव भव्यदिव्य पुतळा आहे. १६ जून १९२८ साली ह्या स्मारकाचे अनावरण झाले होत. पुतळ्याचे वजन तब्बल ८००० किलो आहे. शिवरायांच्या चित्तथरारक इतिहासा सारखाचा ह्या स्मारक निर्मितीचा इतिहास चित्तथरारक आहे.

## मावळच्या कन्येची सर्वत्र चर्चा! प्रणोती नंबरेला राष्ट्रीय विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत कांस्यपदक

वडगाव मावळ : सेंट्रल विद्यापीठ ऑफ हिमाचल प्रदेश या ठिकाणी सुरू असलेल्या राष्ट्रीय विद्यापीठ वेटलिफ्टिंग स्पर्धेत महिला विभागात भारती विद्यापीठ अभिमत विश्वविद्यालयाची विद्यार्थिनी व मावळ तालुक्यातील पवळेवाडी येथील प्रणोती नंबरेने

७१ किलो वजन गटांत कांस्यपदक मिळविले. या स्पर्धेत प्रणोती नंबरेने ७१ किलो वजन गटांत सहभागी होताना स्नॅच आणि क्लीन अँड जर्क मिळून एकूण १८३ किलो वजन उचलत ब्राँझपदक पटकावले. याआधी झालेल्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत प्रणोती नंबरेने सुवर्णपदक मिळविले होते.

संपूर्ण भारतातून ह्या वजनी गटात ३२ मुली सहभागी होत्या, खूप चुरशिच्या लढतीत तिने हे पदक मिळवले पुढे जाऊन




अंतरराष्ट्रीय पदक मिळवण्याचे तिचे स्वप्न आहे,ती भारती विद्यापीठ पुणे मास्टर ऑफ आर्ट्सला शिकत असून

भारती विद्यापीठ अभियंते विश्वविद्यालयाचे कुलपती प्रा. डॉ. शिवाजीराव कदम, भारती विद्यापीठाचे कार्यवाह व भारती विद्यापीठ विश्वविद्यालयाचे प्र-कुलगुरू डॉ. विश्वजीत कदम, कुलगुरू डॉ. विवेक सावजी, आरोग्य विभागाच्या संचालिका डॉ. अस्मिता जगताप, भारती विद्यापीठाचे सहकार्यवाह डॉ. के. डी. जाधव, कुलसचिव जी. जयकुमार, क्रीडा संचालक डॉ. नेताजी जाधव, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विवेक रणखांबे यांनी प्रणोती नंबरचे अभिनंदन केले आहे.

वडगाव मावळ येथील अनिकेत नवघणे यांच्या मार्गदर्शनाखाली गेली पाच वर्षापासुन ती वेटलिफ्टिंगचा सराव करत आहे.भारती विद्यापीठ स्पोर्ट डायरेक्टर नेताजी जाधव तसेच ऍडव्होकेट.सुनील पटेकर याचे मार्गदर्शन लाभले, लखनऊ येथे होणाऱ्या खेलो इंडिया युनिव्हर्सिटी गेम्ससाठी तिची नुकतीच निवड झाली आहे, तिला मिळालेल्या यशामुळे आई रोहिणी पांडुरंग नंबरे वडील पांडुरंग चंदर नंबरे यांच्यासह तिचे मावळ तालुक्यातून,सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## पुण्यात 'घरेही' सुरक्षित नाहीत; गेल्या दोन दिवसांमध्ये तब्बल ५ घरफोडीच्या घटना, चोरट्यांनी थेट

पुणे : पुणे शहरात घरफोड्यांचे सत्र सुरूच असून, फुरसुंगीत चोरट्यांनी स्क्रॅपचे गोडावून फोडून तब्बल ४० लाखांचा ऐवज चोरून नेला आहे. त्यासोबतच दोन दिवसात शहरात घरफोडीच्या ५ घटना घडल्या आहेत. बिबवेवाडी, वानवडी तसेच काळेपडळ, विश्रामबाग, कोथरूड या पोलीस ठाण्याच्या हद्दीत देखील घरफोडीचे गुन्हे घडले आहेत.



याप्रकरणी फुरसुंगी पोलिसांत ५१ वर्षीय व्यवसायिकाने तक्रार दिली आहे. त्यावरून अज्ञात चोरट्यांवर गुन्हा नोंदवला आहे. तक्रारदार व्यवसायिक असून, त्यांचे प्रणाम इंटरप्रायझेसचे गोडाऊन ऊरळी देवाची येथे आहे. दरम्यान, गोडावून बंद असताना चोरट्यांनी भिंतीच्या साईडला असलेला पत्रा उचकटून आत प्रवेश केला. तसेच, गोडाऊनमधील इलेक्ट्रीकलचे ४० लाखांचे स्क्रॅप चोरून पोबारा केला. हा प्रकार मध्यरात्री घडला आहे. अधिक तपास फुरसुंगी पोलीस करत आहेत.तसेच, विश्रामबाग पोलीस ठाण्याच्या हद्दीत लोकमान्य नगर येथे चोरट्यांनी लोखंडी ग्रीलच्या दरवाजाचे ग्रील तोडून आत प्रवेश केला. तसेच, ७ हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. याप्रकरणी ३८ वर्षीय व्यक्तीने तक्रार दिली आहे. तसेच, कोथरूड पोलीस ठाण्याच्या हद्दीत चोरट्यांनी कर्वे रोडवरील गोसावी वस्तीत टायर विक्रीचे दुकान फोडले आहे. येथून चोरट्यांनी ४४ हजार ९५० रुपयांचे नवीन टायर चोरून नेले आहे. याप्रकरणी ३८ वर्षीय दुकान मालकाने तक्रार दिली आहे. तर, काळेपडळ पोलीस ठाण्याच्या हद्दीत बंद घराचे कुलूप उचकटून तिजोरीत ठेवलेले रोख ३० हजार रुपये चोरून नेले आहेत. याप्रकरणी ४६ वर्षीय व्यक्तीने पोलिसांत तक्रार दिली आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

सोमवारी उघडकीस आलेल्या घटनांमध्ये चोरट्यांनी बिबवेवाडी आणि वानवडी येथील दोन बंद फ्लॅट फोडून साडेनऊ लाख रुपयांचा मुद्देमाल चोरून नेला आहे. याप्रकरणी बिबवेवाडी पोलिसांत एका ३९ वर्षीय महिलेने तक्रार दिली आहे. त्यावरून अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार कुटुंबीयांसोबत बाहेर गेले होते. त्यांचे घर दोन दिवस बंद होते. याकाळात त्यांच्या घराच्या दरवाजाचा कडीकोयंडा तोडून चोरट्यांनी बेडरूममधील कपाटातून सोन्या-चांदीचे दागिने असा ८ लाखांचा मुद्देमाल चोरून नेला. दुसरी घटना वानवडीत घडली असून, शिंदेवस्ती येथे राहणाऱ्या २३ वर्षीय तरुणाचे कुटूंबिय शुक्रवारी आणि शनिवारी खासगी कामानिमित्त बाहेर गेले होते. त्यावेळी चोरट्यांनी घराच्या दरावाजाचे कुलूप तोडून सुमारे दीड लाख रुपयांचे सोन्या-चांदीचे दागिने व रोकड चोरून नेली.

पीएमपी बसमध्ये प्रवासी महिला तसेच व्यक्तींकडील दागिने व रोकडवर चोरट्यांकडून डल्ला मारला जात आहे. चोरीच्या तीन घटना घडल्या असून, यात ५ लाख ७० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल चोरीला गेला आहे. विमानतळ परिसरात ३० वर्षीय व्यक्ती जनकबाबा दर्गा ते खराडी बायपास पीएमपीने प्रवास करत होता. त्याने बॅगेत साडे तीन लाखांची रोकड ठेवली होती. प्रवासीतील गर्दीत चोरट्यांनी बॅगेची चैन उघडून ही रोकड चोरून नेली. याप्रकरणी सोमवारी विमानतळ पोलिसांत गुन्हा नोंद केला आहे. तसेच, शनिवारी सायंकाळी स्वारगेट ते कात्रज बस प्रवासादरम्यान ४२ वर्षीय महिलेचे ६० हजार रुपये किमतीचे मंगळसूत्र अज्ञाताने हिसकावून नेले. याप्रकरणी महिलेच्या तक्रारीवरून गुन्हा दाखल झाला आहे. तर, स्वारगेट ते औंध गाव या मार्गावरील पीएमपी बसमध्ये ५८ वर्षीय महिलेच्या गळ्यातील सोनसाखळी आणि मंगळसूत्र असे १ लाख ६० हजारांचा मुद्देमाल हातचलाखीने चोरून नेला. याप्रकरणी चत:शृंगी पोलिसांत गुन्हा दाखल केला आहे.

## कोयत्याने मुंडके तोडण्याची हॉटेल मॅनेजरला दिली धमकी; शिरुर शहरातील कोयता गँग जेरबंद

शिक्रापूर : पुण्यामध्ये कोयता गँग वाढली असून पोलिसांनी अनेकांना दणका दिला आहे. शिरुर शहरात देखील अशीच एक कोयता गँगला जेरबंद करण्यात आले आहे. एका हॉटेल कामगाराला दुचाकीहून सोडण्यासाठी कोयत्याचा धाक दाखवण्यात आला. हॉटेल समोर जाऊन हॉटेल मॅनेजरला कोयता दाखवून मुंडके तोडण्याची धमकी या कोयता गँगने दिली. शिरुरमध्ये दहशत माजवणाऱ्या तिघांना पोलिसांनी जेरबंद केले असून शाहिद गफुर शेख, सोनु उर्फ अश्पाक गफुर शेख व प्रदिप भाउसाहेब गायकवाड असे पोलिसांनी जेरबंद केलेल्या आरोपींची नावे आहे.

शिरुर शहरातील पाबळ फाटा येथून शिवम हॉटेलचा हकिक खान हा दुचाकीहून जात असताना प्रदीप गायकवाड याने त्याला अडवून प्रीतमनगर येथे सोडण्यासाठी दबाव टाकला असताना हकिक हा घाबरून शिवम हॉटेलकडे गेला. त्यांनतर शहीद शेख, सोनू उर्फ अशपाक शेख व प्रदीप गायकवाड यांनी हॉटेल कोयता घेऊन येऊन शिवीगाळ, दमदाटी करत हॉटेल कामगारांना धमकी देत




हॉटेल मॅनेजर पवन बिच्चेवार याला कोयत्याने मुंडके तोडण्याची धमकी दिली. याबाबत हॉटेल चालक सुरेश शंकराव भांगे (वय ६१ वर्ष), रा. गुरुकुल सोसायटी, प्रितम प्रकाश नगर, शिरूर ता. शिरूर जि. पुणे यांनी शिरुर पोल्सिंत फिर्याद दिल्याने पोलिसांनी शाहिद गफुर शेख, सोनु उर्फ अशपाक गफुर शेख व प्रदिप भाउसाहेब गायकवाड या तिघांवर भारतीय हत्यार कायदा कलम नुसार गुन्हे दाखल केले होते.

त्यांनतर पोलीस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या आदेशानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक दिपक करांडे, पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलीस हवलदार नाथसाहेब जगताप, सचिन भोई, नितेश थोरात, शेखर झाडबुके, विजय शिंदे, रविंद्र आव्हाड, निरज पिसाळ यांनी शिरुर शहरातील रेणुका माता मंदीर परिसरात सापळा रचून शाहिद गफुर शेख, सोनु उर्फ अश्पाक गफुर शेख व प्रदिप भाउसाहेब गायकवाड तिघे रा. प्रितम प्रकाश नगर शिरूर ता शिरूर जि पुणे यांना ताब्यात घेत त्यांच्या जवळील कोयता जप्त करुन अटक केली सर्व आरोपींना न्यायालयात हजर केले न्यायालयाने त्यांना दोन दिवस पोलीस कोठडीत ठेवण्याचे आदेश दिले असून पुढील तपास पोलीस हवालदार नाथसाहेब जगताप करत आहे.

## किल्ल्यावर एकही अतिक्रमण राहणार नाही; शिवजयंतीला मुख्यमंत्री फडणवीसांचा शिवनेरीवरुन शब्द

**पुणे । प्रतिनिधी**

छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती महाराष्ट्रासह संपूर्ण देशभरामध्ये साजरी केली जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांची ३९५ वी जयंती साजरी केली जात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म पुण्यातील शिवनेरी किल्ल्यावर झाला होता. शिवनेरी किल्ल्यावर शिवजयंतीचा शासकीय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह उपमुख्यमंत्री अजित पवार आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे किल्ल्यावर दाखल झाले आहेत.



शिवनेरी किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांना मानवंदना वाहिली. त्याचबरोबर पाळणा म्हणून शिवजयंती उत्साहामध्ये साजरी केली. यावेळी तरुणांची मोठी गर्दी किल्ल्यावर दिसून येत आहे. शिवनेरी किल्ल्यावर फुलांची आरास आणि सजावट करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे रांगळ्यांच्या पायघड्या घालण्यात आल्या आहेत. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या आहेत.

यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला आहे. यावेळी शिवनेरीवर फडणवीस म्हणाले की, जगभरातील शिवप्रेमींना छत्रपती शिवरायांच्या जन्मोत्सवाच्या मनापासून शुभेच्छा. आजपासून पाच वर्षांनी छत्रपती शिवरायांचा ४००वा जन्मोत्सव आपण साजरा करणार आहोत. शिवनेरीवर आल्यावर आपल्याला जी स्वराज्याची स्फूर्ती मिळते ते घेऊन महाराष्ट्राची सेवा करण्यासाठी आम्ही सर्व लोक येथे येत असतो, अशा भावना मुख्यमंत्री फडणवीसांनी व्यक्त केल्य आहेत.

पुढे ते म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराज केवळ एक योद्धा नव्हते तर एक चांगले प्रशासक देखील होते. आम्ही त्यांच्या सर्व किल्ल्यांचा विकास करू. आम्ही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या सर्व किल्ल्यांवरील अतिक्रमण हटविण्यासाठी एक टास्क फोर्स स्थापन केली आहे. छत्रपती शिवरायांचे किल्ले हे आमच्यासाठी कोणत्याही मंदिरापेक्षा मोठे आहेत. म्हणून या किल्ल्यांचं संवर्धन झालं पाहिजे, असेही मत मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी सांगितले. पुढे ते म्हणाले की, स्वराज्याची राजधानी रायगड येथे अनेक कामे आपण सुरू केले आहेत. मला सांगताना आनंद वाटतो की आपण एक टास्क फोर्स तयार केला आहे. शिवाजी महाराजांच्या किल्ल्यावरील सगळी अतिक्रमण काढून टाकण्याचा निर्णय आपण घेतला आहे. काही झालं तरी अतिक्रमणं तिथं राहाणार नाहीत, अशा शब्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शिवजयंतीच्या निमित्ताने शिवनेरीवर दिला आहे.आम्ही शासक नाही, छत्रपती शिवाजी महाराजांचे मावळे आहोत! दार्या घाटापासून शिवनेरी परिसराच्या विकासापर्यंत सर्व मुद्दे पूर्ण करण्यासाठी आम्ही कार्यरत राहू, असे देखील देवेंद्र फडणवीस यांनी सोशल मीडिया पोस्टवर केले आहे.

## चंद्रकांत पाटलांना 'ते' वक्तव्य भोवणार? 'मविआ'चा हायकोर्टात जाण्याचा इशारा

**पुणे । प्रतिनिधी**

**महापालिकेचे अंदाजपत्रकासंदर्भात मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलेले वक्तव्य वादग्रस्त ठरणार आहे. या वक्तव्याचा आधार घेत महाविकास आघाडीने उच्च न्यायालयात दाद मागण्याचा इशारा दिला आहे. भाजपच्या माजीनगरसेवक, आमदार , पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या कामांच्या यादीचा आगामी अंदाजपत्रकात समावेश केला जाण्यासंदर्भात पाटील यांनी नुकतेच वक्तव्य केले होते.**

महापालिकेचे आगामी आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक महापालिका आयुक्त डॉ. राजेंद्र भोसले हे तयार करीत आहे. या संदर्भातील बैठका त्यांनी विधान भवन येथे घेतल्याने उलट सुलट चर्चा सुरु झाली. या अंदाजपत्रकात भाजपचा वरचष्मा राहील, भाजपच्या माजी नगरसेवकांनी सुचविलेल्या तसेच आमदारांनी सुचविलेल्या कामांसाठी तरतुदी केल्या जातील अशी चर्चा सुरु झाली.

दरम्यान, नुकतेच मंत्री चंद्रकांत पाटील यांनी पक्षाच्या कार्यशाळेत '' मी आणि केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी महापालिका आयुक्तांकडे बसून विधानसभा निहाय निधीचा कोटा निश्चित केला आहे. आयुक्तांकडे कामांच्या याद्या दिल्या आहेत. या कामांचा समावेश महापालिकेच्या अंदाजपत्रकात होईल, याची खात्री आम्ही दोघेही दररोज करीत आहोत,'' असे वक्तव्य केले होते. त्याचे राजकीय पडसाद आता उमटू लागले आहे.

मंगळवारी महाविकास आघाडीच्या शिष्टमंडळाने आयुक्त डॉ. भोसले यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले. यावेळी शरद पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, माजी



नगरसेवक सचिन दोडके, शिवसेनेचे ( ठाकरे गट) शहरप्रमुख संजय मोरे, गजानन थरकुडे, समन्वयक वसंत मोरे, अशोक हरणावळ, माजी आमदार रवींद्र धंगेकर आदींचा समावेश असलेल्या शिष्टमंडळाने आयुक्त डॉ. भोसले यांच्याकडे आगामी आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक हे पारदर्शी असावे, सत्ताधारी भाजपच्या लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांचा समावेश करायचा असेल तर इतर पक्षाच्या माजी नगरसेवक, लोकप्रतिनिधींनी सुचविलेल्या कामांचा समावेश करावा. यासाठी आम्ही कामाच्या याद्या देऊ अन्यथा उच्च न्यायलयात आम्ही दाद मागू असा इशारा दिला आहे. आयुक्त भोसले यांची भेट घेतल्यानंतर शिष्टमंडळाने पत्रकार परीषदेत भुमिका स्पष्ट केली. आयुक्त भोसले यांनी देखील कोणाच्याही राजकीय दबावाला मी बळी पडणार नसल्याचे सांगितल्याचे महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी नमूद केले.

'' यापुर्वी २००८ साली आमदारांनी सुचविलेल्या कामांसाठी प्रथमच तरतुद केली गेली. परंतु ती जास्त नव्हती. सध्या मात्र चुकीचा पायंडा पाडला जात आहे. त्याविरोधात आंदोलन करावे लागणार आहे. या अंदाजपत्रकात महायुतीमधील शिवसेना आणि अजित पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसलाही डावलले जात आहे'' प्रशांत जगताप (शहराध्यक्ष : राष्ट्रवादी कॉंग्रेस - शरद पवार गट)

'' मंत्री चंद्रकांत पाटील यांनी भाजपच्या कार्यशाळेत केलेल्या विधानामुळे महापालिकेच्या अंदाजपत्रकात भाजपचा वरचष्मा राहणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. वास्तविक सर्वांना न्याय दिला पाहीजे. अन्यायकारक अंदाजपत्रक सादर झाले तर त्याविरोधात आंदोलन करावे लागेल''-संजय मोरे ( शहर प्रमुख - शिवसेना ठाकरे गट )

प्रत्येक इच्छुकाकडून ५० ते शंभर कोटी रुपयांच्या याद्या

महापालिका आयुक्त डॉ. भोसले यांनी महापालिका निवडणुकीसाठी इच्छुक असलेल्या प्रत्येकाकडून सुमारे ५० ते शंभर कोटी रुपयांपर्यंतच्या कामाच्या याद्या आल्या आहेत. तसेच आमदारांकडूनही याद्या आल्या आहेत, असे पत्रकारांशी बोलताना नमूद केले. अंदाजपत्रक तयार करताना प्रशासनाच्या भुमिकेशी सुसंगत असलेल्या प्रस्तावांचा अंदाजपत्रकात विचार केला जाईल. मागणी कितीही होत असली तरी सर्व कामांना निधी देणे शक्य होणार नाही. विभागीय आयुक्त कार्यालयात अंदाजपत्रकासंदर्भात बैठक झाली नाही. घोले रोड आणि मुख्य भवनात दोन बैठका झाल्या आहेत , येथे नागरीकांची गर्दी असते, त्यामुळे व्हीव्हीआययपी सर्कीट हाऊस येथे एक बैठक झाली, असे आयुक्त भोसले यांनी नमूद केले.

## पाणीपुरवठा बंदचा मेसेज... सावधान ! बँक खात्यांवर सायबर गुन्हेगारांचा डोळा

पिंपरी : पिंपरी-चिंचवड शहरात सायबर गुन्हेगारांनी नागरिकांना गंडवण्यासाठी नवीन फंडा सुरू केला आहे. पाणीपुरवठा बंद होणार असल्याचा बनावट संदेश पाठवून नागरिकांना आपल्या जाळ्यात ओढले जात आहे. यातील विशेष बाब म्हणजे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या नावाने हे संदेश पाठवले जात आहेत. मागील महिन्याचे बिल न भरल्यामुळे पाणीपुरवठा बंद केला जाणार असल्याचे मेसेजमध्ये नमूद असते. हा संदेश मिळाल्यानंतर नागरिक भीतीपोटी दिलेल्या नंबरवर संपर्क साधतात. त्यानंतर सायबर गुन्हेगार विश्वासात घेऊन त्यांची आर्थिक लूट करत आहेत.

... अशी आहे मोडससायबर गुन्हेगार नागरिकांकडून संपर्क साधल्यानंतर त्यांना प्रलंबित पाणीपट्टी भरण्यास सांगतात. थहर्री र्ह्विारे एक -Pk फाईल पाठवली जाते. ही फाईल डाउनलोड केल्यानंतर मोबाईलमध्ये मालवेअर (Malware) हा व्हायरसचा शिरकाव केला जातो. यामुळे मोबाईलमधील सर्व डेटा हॅक केला जातो. बँक खात्यातील संवेदनशील माहिती चोरी केली जाते. काही वेळातच नागरिकांच्या खात्यातून मोठ्या प्रमाणात रक्कम परस्पर काढली जाते किंवा ऑनलाइन पैसे वळवले जातात. कोणत्याही मेसेजवर विश्वास ठेवू नका. या संदर्भात पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या अधिकार्यांनी स्पष्टीकरण दिले आहे की, 'पाणीपुरवठा बंद करण्यासंबंधी कोणत्याही प्रकारचा SMS किंवा Whats-pp संदेश महापालिकेकडून पाठवला जात नाही. प्रलंबित पाणीबिलाची अधिकृत माहिती पालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असते. महापालिकेच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, पाणीपुरवठा बंद करण्यासंदर्भातील कोणत्याही संदेशावर विश्वास ठेवण्यापूर्वी त्याची सत्यता तपासा.